१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, गुरुवार १६ एप्रिल, २०२६ • वर्ष-५, अंक-२०७, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 207 Marathi - Daily - Pune, 16 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

राजकारण्यांचे फोन आणि अघोरी कृत्यांचा संशय?

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews


## थोडक्यात

### आजपासून संसदेचे विशेष अधिवेशन सुरू

**नवी दिल्ली** - संसदेचे विशेष अधिवेशनला उद्यापासून सुरुवात होत आहे. हे अधिवेशन उद्यापासून १८ एप्रिल पर्यंत असणार आहे. या विशेष अधिवेशनात एकूण तीन महत्त्वाची विधेयके सादर केली जाणार आहेत. अधिवेशनात महिलांना लोकसभा तसेच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या विधान सभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याच्या अंमलबजावणीसाठी



आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पुढे नेण्यावर भर असेल. महिलांना एक तृतीयांश (३३ टक्के) आरक्षण देण्यासाठी सप्टेंबर २०२३ मध्ये घटनादुरुस्ती करण्यात आली होती. मात्र, या आरक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी जनगणनेनंतर होणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतरच शक्य होणार आहे. त्यामुळे या अधिवेशनात मांडला जाणारा पुनर्रचना प्रक्रियेसंदर्भातील कायदा महत्त्वाचा

पान ७ वर

### पश्चिम बंगाल निवडणूक मुंबईहून विशेष रेल्वे

**मुंबई** - पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक २३ एप्रिल आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यांत पार पडणार असून, या निवडणुकीसाठी शनिवारी १८ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून पश्चिम बंगालसाठी विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहे. महाराष्ट्रात मुंबई, पुणे आणि इतर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात पश्चिम बंगालमधील कामगार वास्तव्यास आहेत. विशेषत: असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या बंगाली मतदारांना त्यांच्या गावी जाऊन मतदान करता यावे, यासाठी या विशेष रेल्वेची व्यवस्था करण्यात आली आहे. या गाडीतून अंदाजे ७ हजार मतदार पश्चिम बंगालात जाणार आहेत.

### उपमुख्यमंत्री शिंदेंचे सर्व कार्यक्रम रारवीव

**ठाणे** - राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजचे सर्व अधिकृत कार्यक्रम राखीव ठेवत ठाण्यातच मुक्काम केला. ते ठाण्यातील लुईसवाडी परिसरात दिवसभर उपस्थित होते. शिंदे यांनी आज ठाण्यात काही महत्त्वाच्या भेटीगाठी घेतल्या. या भेटींचा तपशील मात्र अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आला नाही. उपमुख्यमंत्र्यांचे वेळापत्रक व्यग्र असूनही आजचे सर्व कार्यक्रम अचानक राखीव ठेवण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

# अजित पवारांच्या घराबाहेर जादुटोणा केला तेव्हा भोंदू अशोक खरात ठाण्यात होता

**स्थानिक स्वराज्य निवडणुकांवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष दिवंगत अजित पवार यांच्या बारामतीतील घरासमोर १८ नोव्हेंबर २०२५ रोजी जादूटोणा करण्यात आला होता. त्यांच्या घराबाहेर लिंबू, नारळ, मिरची, काळे कापड असे टाकले होते. त्याच्या आदल्याच रात्री म्हणजे १७ नोव्हेंबर २०२५ रोजी भोंदू अशोक खरात ठाण्यात आला होता. १८ नोव्हेंबरला जादूटोण्याचा प्रकार उघड झाला. त्या दिवशीही खरात ठाण्यातच होता. ठाणे पश्चिम येथील एका रेस्टॉरंटमध्ये तो बसला होता, त्याच १८ तारखेला खरातने ६ आर्थिक करार केले असा सूचक गौप्यस्फोट आज सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषदेत केला. स्वत: एकनाथ शिंदे यांच्यासह शिंदे गटातील नेत्यांचे भोंदू खरातसोबतचे फोटो दाखवत, शिंदे गट खरातच्या इतका जवळ का होता याचा एसआयटीने कसून तपास करावा, अशी मागणीही दमानिया यांनी केली.**

## अंजली दमानियांचा सूचक गौप्यस्फोट

■ मुंबई

**दमानिया** यांनी आज खरातशी जवळीक असलेल्या काही राजकीय नेत्यांचे खरातसोबतचे फोटो दाखवले. यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, आमदार दीपक केसरकर, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांचा समावेश होता. हे फोटो दाखवत दमानिया यांनी सवाल केला की, खरातशी एकनाथ शिंदे गटाची एवढी जवळीक का होती याचा तपास पोलिसांनी अद्याप का केला नाही?

शिंदे गटातील नेत्यांचे खरातशी असलेले घनिष्ठ संबंध, आपण सिद्धपुरुष असल्याचा खरातचा दावा, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तोंडावर १८ नोव्हेंबर २०२५ रोजी अजित पवार यांच्या घराजवळ करण्यात आलेला जादुटोण्याचा प्रकार, त्याच दिवशी खरातचे ठाण्यात ठाण मांडून बसणे, त्याच दिवशी खरातशी संबंधित समता पतसंस्थेत अवघ्या ३४ सेकंदांत ६ मोठे आर्थिक व्यवहार झाले आणि अजित पवार यांचा ज्या दिवशी अपघातात मृत्यू झाला त्यादरम्यान समता पतसंस्थेत तब्बल ५ कोटी ३३ लाख रुपयांचे आर्थिक व्यवहार हा सारा घटनाक्रम पाहता यावरून अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूशी काही तरी संबंध आहे, असा संशय निर्माण होतो.

पान ७ वर

### उपजिल्हाधिकारी भांडे-पाटीलची चौकशी करा! ते मदत करतात

आधी मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसनमध्ये असलेले आणि आता दुसरीकडे नेमणूक झालेले उपजिल्हाधिकारी अभिजित भांडे-पाटील यांना नोकरीवरून काढून त्यांची चौकशी करा, अशी मागणी करत अंजली दमानिया म्हणाल्या की, या भांडे-पाटील यांच्याकडे दोन फोन आहेत, त्यातील एका फोनवरून त्याने खरातला १४३ कॉल केले तर दुसऱ्या फोनवरून ५३ कॉल केले. याच भांडे-पाटीलने खरातची फरार पत्नी कल्पना व मुलगा हर्षवर्धन याला संरक्षण दिले आहे.

## आदित्य ठाकरेंकडे 'उबाठा'ची कार्याध्यक्षपदाची जबाबदारी?

### १९ जूनला निर्णयाची शक्यता

**उबाठात मोठा संघटनात्मक बदल होण्याची शक्यता वर्तवली जात असून, युवासेना प्रमुख आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्याकडे पक्षाच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाण्याची चर्चा सुरू आहे.**



■ मुंबई

**येत्या** १९ जून रोजी पक्षाच्या वर्धापन दिनी हा निर्णय जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

या निर्णयामुळे आदित्य ठाकरे यांचे पक्षातील स्थान अधिक मजबूत होणार असून, त्यांच्याकडे संघटनात्मक आणि निर्णयप्रक्रियेतील मोठे अधिकार येण्याची शक्यता आहे. २००३ साली पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या प्रकारे उद्धव ठाकरे यांना शिवसेनेत कार्याध्यक्षपदाची जबाबदारी दिली होती, त्याच धर्तीवर आदित्य ठाकरे यांच्याकडे ही जबाबदारी सोपवली जाऊ शकते, असा दावा उबाठातील काही नेत्यांकडून केला जात आहे. पक्षाच्या कार्यकारिणी बैठकीत याबाबत औपचारिक प्रस्ताव मांडून मंजुरी दिली जाऊ शकते, अशीही शक्यता व्यक्त होत आहे. गेल्या काही वर्षांपासून आदित्य ठाकरे हे पक्ष संघटना, निवडणूक नियोजन आणि विविध महत्त्वाच्या

पान ७ वर

## नीरव मोदीला भारतात आणणार? सीबीआय टीम लंडनमध्ये दारवल

■ नवी दिल्ली

**सीबीआयचे** अधिकारी आणि कायदेशीर तज्ज्ञांचा समावेश असलेली एक टीम नीरव मोदीला भारतात परत घेऊन येण्याच्या प्रक्रियेच्या अंतिम औपचारिकतेसाठी लंडनला गेली आहे. लंडनमधील हाय कोर्ट ऑफ जस्टिसच्या किंग्स बेंच डिव्हिजनने नीरव मोदी याच्या प्रत्यार्पण आदेशाविरोधात पुन्हा सुनावणी सुरू करण्याच्या याचिकेला नकार दिल्यानंतर हे पथक युकेमध्ये पोहोचले आहे. नीरव मोदीच्या प्रत्यार्पणात आता फक्त एकच कायदेशीर अडथळा आहे. नीरव मोदीने फ्रान्समध्येही एक याचिका दाखल केली आहे. या याचिकेद्वारे त्याने युरोपियन कोर्ट ऑफ ह्युमन राईट्सची मदत मागितली असून, या प्रकरणाला गोपनीय म्हणून चिन्हांकित करण्यात आले आहे. स्ट्रासबर्ग येथे पुढील काही दिवसांत भारतीय बाजूच्या उपस्थितीत या याचिकेची सुनावणी होण्याची शक्यता आहे. ही याचिका फेटाळल्यास नीरवला भारतात आणले जाऊ शकते. नीरव मोदी सध्या लंडनमधील वेंड्सवर्थ जेलमध्ये आहे.

## सुप्रिया सुळेंच्या होणाऱ्या जावयाच्या कंपनीसोबत राज्य सरकारचा करार

■ मुंबई

**राष्ट्रवादी** शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे यांच्या विवाहाची चर्चा सुरू असतानाच, त्यांचे होणारे जावई सारंग लखानी यांच्या कंपनीसोबत राज्य सरकारने मोठा सामंजस्य करार केला आहे. या कराराची एकूण किंमत सुमारे ५,७६० कोटी रुपये असून, राज्यातील ऊर्जा क्षेत्रासाठी हा करार महत्त्वाचा मानला जात आहे.

महाराष्ट्र सरकारने लखानी कुटुंबाच्या नोव्हॅरियन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबत हा करार केला आहे. जलसंपदा विभागामार्फत हा प्रकल्प राबवण्यात येणार असून, रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील रानवाडी येथे त्याची अंमलबजावणी होणार आहे. या प्रकल्पातून सुमारे १,२०० मेगावॅट वीजनिर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लखानी कुटुंबाचा उद्योग क्षेत्रात दीर्घ अनुभव असून, त्यांनी यापूर्वीही विविध प्रकल्पांमध्ये सहभाग घेतला आहे. या कराराबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्र उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या माध्यमातून देशात सर्वाधिक ऊर्जानिर्मिती क्षमता असलेले राज्य बनण्याच्या




दिशेने वाटचाल करत आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असून भविष्यात एक लाख मेगावॅट वीजनिर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

## युद्ध समाप्ती अत्यंत जवळ डोनाल्ड ट्रम्प यांचे वक्तव्य

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आज पुन्हा एकदा म्हणाले की, युद्ध समाप्ती अत्यंत जवळ असून पुढील दोन दिवसांत इराणसोबत चर्चा पुन्हा सुरू होऊ शकते. त्यासाठी पाकिस्तान हे संभाव्य ठिकाण असू शकते. चीन, इराणला शस्त्रास्त्रे देणार नाही, असाही दावा त्यांनी आज केला.

ट्रम्प यांनी एका मुलाखतीत म्हटले की, परिस्थिती झपाट्याने बदलत आहे, त्यामुळे चर्चा लवकरच पुन्हा सुरू होऊ शकते. पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर चांगले काम करत आहेत, ज्यामुळे तिथे चर्चा होण्याची शक्यता वाढली आहे. होर्मुजची नाकेबंदी करून आम्ही इराणचा सगळा व्यापार ठप्प केला आहे. आमचे काम अजून संपलेले नाही. आम्ही जर आता युद्ध थांबवले, तरी त्यांना आपला देश पुन्हा उभा करायला २० वर्षे लागतील. पुढे काय होते ते पाहू. मला वाटते की, त्यांना करार करण्याची खूप तीव्र इच्छा आहे. ट्रम्प यांनी चीनबाबत बोलताना म्हटले की, चीनने इराणला शस्त्रे न पाठवण्याचे मान्य केले आहे. मी होर्मुजेची सामुद्रधुनी कायमस्वरूपी खुली करत असल्यामुळे चीन खूप आनंदी आहे.

## १७ ते २५ एप्रिलदरम्यान अवकाळी पाऊस! पंजाब डरव यांचा इशारा

■ मुंबई

**राज्यातील** काही भागांमध्ये १७ ते २५ एप्रिल दरम्यान अवकाळी पावसाची शक्यता असल्याचा इशारा हवामान अभ्यासक पंजाब डख यांनी दिला आहे.

ते म्हणाले की, १७, १८ आणि १९ एप्रिल दरम्यान राज्यातील काही भागांत तुरळक स्वरूपात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी तो जोरदार असू शकतो. १६ एप्रिलला उन्हाची तीव्रता वाढून तापमान ४० ते ४३ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर वातावरणात अचानक बदल होऊन ढगाळ परिस्थिती निर्माण होईल. दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा तसेच पुण्याच्या पश्चिम भागात १७ ते १९ एप्रिल दरम्यान पावसाची सुरुवात होईल. काही ठिकाणी गारपीट आणि जोरदार वाऱ्यांची शक्यता आहे. ज्या शेतकऱ्यांचा कांदा, हळद काढणीला आला आहे, त्यांनी १७ एप्रिलपूर्वीच पिके सुरक्षित झाकून ठेवावीत. २१ ते २५ एप्रिल दरम्यान पुन्हा पावसाचा जोर वाढू शकतो. त्यामुळे अधिक सावध राहणे आवश्यक आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही टप्प्याटप्प्याने हवामानात बदल होणार असून नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव तसेच नागपूर, अकोला, अमरावती या भागांत २२ ते २४ एप्रिल दरम्यान पावसाचा प्रभाव जाणवेल. हा पाऊस सर्वत्र नसला तरी काही ठिकाणी गारपीट आणि वाऱ्यासह येण्याची शक्यता आहे.

## सुनेत्रा काकींच्या प्रचारासाठी पुतण्या रोहित पवार मैदानात

■ बारामती

**अजित** पवार यांच्या निधनामुळे बारामतीत होत असलेल्या पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार रिंगणात उतरल्या आहेत. त्यांच्या प्रचारासाठी अजित पवार यांचे पुतणे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारही मैदानात उतरले आहेत. त्यांनी आज अजित पवार यांच्या काटेवाडी गावातून घोंगडी बैठकीच्या माध्यमातून सुनेत्रा पवारांच्या प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी त्यांचे वडील राजेंद्र पवार आणि बहीण सई पवारदेखील उपस्थित होती.

रोहित पवार म्हणाले की, आतापर्यंत प्रचार म्हटला की तो पवारसाहेबांचा किंवा अजित दादांचा असायचा. लहानपणी मी अजित दादांच्या प्रचारासाठी सायकल रॅलीही काढली होती. त्यांनीच मला जिल्हा परिषदेसाठी तिकीट दिले होते.

पान ७ वर

## २५ वर्षे कैद पूर्ण झालेली नाही अबू सालेमची मागणी कोर्टाने फेटाळली

■ मुंबई

**आपली** शिक्षा कमी करून लवकर सुटका करावी, अशी विनंती करणारी सध्या तुरुंगात असलेला गँगस्टर अबू सालेम याने केलेली याचिका आज मुंबई हायकोर्टाने फेटाळून लावली. न्यायमूर्ती अजय एस. गडकरी आणि कमल आर. खाटा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, २५ वर्षांचा आवश्यक कारावास कालावधी अद्याप पूर्ण झालेला नाही. त्यामुळे त्याची सुटका करता येणार नाही. न्यायालयाने सालेमच्या संभाव्य सुटकेची तारीख निश्चित करण्याची मागणीही नाकारली.



सालेमला ११ नोव्हेंबर २००५ रोजी पोर्तुगालमधून भारतात आणण्यात आले होते. त्यानंतर त्याला २४ नोव्हेंबरला अटक करून त्याच्यावर विविध गुन्ह्यांमध्ये खटले चालवण्यात आले. २०१७ मध्ये १९९३च्या बॉम्बस्फोट प्रकरणात त्याला दोषी ठरवण्यात आले. तर २०१५ मध्ये मुंबईतील बांधकाम व्यावसायिक प्रदीप जैन यांच्या हत्येप्रकरणी त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. अबू सालेमने 'रिमिशन' म्हणजे चांगल्या वर्तनाच्या कारणावर शिक्षा कमी करण्याची सवलत देण्यासाठी अर्ज केला होता. डिसेंबर २०२४ मध्ये विशेष टाडा न्यायालयाने त्याचा दावा फेटाळल्यानंतर त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्याने असा

पान ७ वर

## 'कैसे हराया' फेम सहर शेरवचा जातीचा दारवला अवैध?



**ठाणे महापालिका निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांना उद्देशून 'कैसे हराया' असे वक्तव्य करून चर्चेत आलेल्या एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख आता नव्या वादात सापडल्या आहेत. त्यांचा जातीचा दाखला अवैध असल्याचे उघड झाल्याने त्यांचे नगरसेवक पद धोक्यात आले आहे.**

■ ठाणे

**या प्रकरणी** तक्रारदार सिद्दीकी फरहा सबाब अहमद यांनी ठाणे उपविभागीय अधिकारी कार्यालयात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, सहर शेख यांचे वडील युनूस शेख हे मूळचे उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील रहिवासी आहेत. महाराष्ट्रात स्थलांतर केल्यानंतर, नियमानुसार 'नमुना १०' लागू असताना त्यांनी अधिकाऱ्यांची दिशाभूल करून नमुना ८ चा वापर करत ओबीसी प्रवर्गाचा जात दाखला मिळवला, असा आरोप करण्यात आला आहे.

यानंतर ठाणे तहसीलदार उमेश पाटील यांनी आपला चौकशी अहवाल सादर केला. या अहवालात तक्रारीत तथ्य आढळल्याचे स्पष्ट झाले आहे. तपासादरम्यान सहर शेख या मूळच्या गाझियाबाद येथील असल्याचेही निष्पन्न झाले असून, दुसऱ्या राज्यातील रहिवासी असताना महाराष्ट्रातील आरक्षणाचा लाभ घेतल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

## भाजपाच्या सम्राट चौधरी यांनी बिहारच्या मुरव्यमंत्रिपदाची शपथ घेतली

■ पाटणा

**बिहारमध्ये** नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर भाजपाचे सम्राट चौधरी यांनी आज राज्याचे २४ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल सय्यद अता हसनैन यांनी सम्राट चौधरी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यांच्यासोबत विजय कुमार चौधरी आणि बिजेंद्र प्रसाद यादव यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

पाटणा येथील लोकभवनात झालेल्या शपथविधी सोहळ्यास जे. पी. नड्डा, चिराग पासवान यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. माजी मुख्यमंत्री नितीश कुमार हेही यावेळी उपस्थित होते. शपथविधीपूर्वी सम्राट चौधरी यांनी पाटणा येथील पंचरूपी हनुमान मंदिरात जाऊन पूजा केली. त्यानंतर ते लोकभवनात दाखल झाले. शपथ घेतल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी 'बुलडोजर बाबा झिंदाबाद' अशा घोषणा दिल्या.

सम्राट चौधरी यांनी राजद-जदयू आणि भाजपा असा राजकीय प्रवास केला आहे. ते एकेकाळी लालू प्रसाद यादव यांचे निकटवर्तीय मानले जात होते. २०१४ मध्ये त्यांनी जनता दल (युनायटेड) मध्ये प्रवेश केला.

## पंपावर इंधन दर स्थिर ठेवल्याने सरकारी कंपन्यांचा तोटा वाढला

■ नवी दिल्ली

**आंतरराष्ट्रीय** बाजारात कच्च्या तेलाचे दर १०० रुपये प्रति बॅरलच्यावर जाऊनही भारतात पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर ठेवल्यामुळे सरकारी तेल कंपन्यांचा तोटा प्रचंड वाढला आहे. इंडियन ऑईल, बीपीसीएल आणि एचपीसीएल या सरकारी कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लीटर १८ रुपये आणि डिझेलवर प्रति लीटर २५ रुपयांपर्यंत तोटा होत आहे. हा इंधन तोटा भरून काढण्यासाठी कंपन्या आता दर वाढवण्याच्या विचारात आहेत, तरीही सध्या दर स्थिर आहेत.

देशातील सरकारी तेल विपणन कंपन्या मोठ्या आर्थिक संकटातून जात आहेत. एप्रिल २०२२ पासून पेट्रोल आणि डिझेलचे किरकोळ दर स्थिर ठेवण्यात आले आहेत. मात्र, याच काळात आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे, इंडियन ऑईल भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लीटर १८ रुपये तर डिझेलवर प्रति लीटर ३५ इतका तोटा सहन करावा लागत आहे.

कच्च्या तेलाच्या किमती १० रुपये प्रति बॅरल ओलांडल्यानंतर



इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियमच्या शेअरच्या किमतीत ४ टक्क्यांपर्यंत घसरण दिसून आली.

# ती जुनी डायरी

**बहिणींनी सख्ख्या भावावर संपत्तीसाठी कोर्टात केस टाकली, पण जेव्हा भावाने कोर्टात ती एक डायरी उघडली, तेव्हा न्यायाधीशांनी सुनावलेला निर्णय ऐकून अख्खं कोर्टरूम सुन्न झालं..**

**कोर्टाच्या** बाहेर नेहमीसारखीच गर्दी होती, पण आज एका केसची कोर्टरूममध्ये दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. समोरच्या बाकावर ३५ वर्षांचा 'माधव' शांतपणे मान खाली घालून बसला होता. त्याच्या चेहऱ्यावर राग नव्हता, तर सख्ख्या नात्यांनी दिलेल्या धोक्याची एक अगतिकता होती. त्याच्या विरुद्ध बाजूला त्याच्या दोन सख्ख्या बहिणी, 'सुनीता आणि कविता', त्यांच्या नवऱ्यांसोबत (माधवच्या दाजींसोबत) उभ्या होत्या.

माधवचे वडील, 'आप्पासाहेब' साताऱ्यात एका साध्या शाळेत क्लार्क होते. आयुष्यभर काटकसर करून त्यांनी साताऱ्यात एक छोटंसं तीन खोल्यांचं घर आणि गावाकडे दीड एकर शेती एवढीच ३०-४० लाखांची पुंजी कमवली होती. आप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर वर्षभरातच, दाजींच्या (बहिणींच्या नवऱ्यांच्या) चिथावणीवरून सुनीता आणि कविता यांनी वडिलांच्या संपत्तीत 'समान वाटा' मिळावा म्हणून स्वतःच्या सख्ख्या भावावर, माधववर कोर्टात दावा ठोकला होता.

कोर्टाची सुनावणी आणि तो भावनिक प्रसंग,

न्यायाधीश देशमुख साहेब आपल्या खुर्चीवर बसले. बहिणींच्या वकिलांनी अत्यंत आक्रमकपणे युक्तिवाद सुरू केला, माय लॉर्ड, हिंदू वारसा हक्क कायद्यानुसार मुलींचा वडिलांच्या संपत्तीवर मुलाएवढाच समान हक्क आहे. माधवने हे घर स्वतःच्या नावावर करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे माझ्या अशिलांना या घराचा आणि शेतीचा प्रत्येकी एक तृतीयांश (१/३) वाटा मिळावा!

न्यायाधीशांनी माधवकडे पाहिले. माधवने स्वतःसाठी कोणताही वकील दिला नव्हता. तो शांतपणे कठड्यात उभा राहिला. न्यायाधीशांनी विचारले, माधव, तुला यावर काय सांगायचंय? तुला तुझ्या बहिणींना संपत्तीत वाटा द्यायचा नाहीये का?

माधवचे डोळे पाणावले. त्याने एक दीर्घ श्वास घेतला आणि अत्यंत शांत आवाजात तो म्हणाला,

साहेब, त्या माझ्या सख्ख्या बहिणी आहेत. त्यांनी माझ्याकडे प्रेमाने जीव मागितला असता, तर मी तोही दिला असता, तिथे या विटा-मातीच्या घराची काय किंमत? त्यांचा वडिलांच्या संपत्तीवर पूर्ण हक्क आहे आणि मला तो त्यांना द्यायचा आहे... पण माझी एक छोटीशी अट आहे.

ती 'जुनी डायरी' आणि सत्याचा स्फोट

माधवने आपल्या पिशवीतून एक अत्यंत जुनी, जिर्ण झालेली 'लाल डायरी' आणि काही हॉस्पिटलच्या फाईल्स काढल्या आणि त्या न्यायाधीशांच्या टेबलवर ठेवल्या.

माधव रडत म्हणाला, साहेब, हे घर आणि शेती नक्की तिघांत समान वाटा. पण संपत्ती वाटताना वडिलांनी मागे ठेवलेलं 'कर्ज आणि जबाबदारी' सुद्धा समान वाटली पाहिजे ना? या फाईलमध्ये वडिलांच्या कॅन्सरच्या उपचारांचे ९ लाखांचे



बिल आहे, जे मी आजही माझ्या पगारातून हप्ते भरून फेडतोय. या लाल डायरीत दोन्ही बहिणींच्या लग्नासाठी वडिलांनी काढलेल्या ५ लाखांच्या कर्जाचा हिशोब आहे, ज्यासाठी मी माझं शिक्षण अर्धवट सोडून नोकरीला लागलो.

माधव तिथेच थांबला नाही. त्याने पाणावलेल्या डोळ्यांनी आपल्या बहिणींकडे बघितले आणि म्हणाला, सर्वात महत्त्वाची गोष्ट... साहेब, माझी ७० वर्षांची आई गेल्या तीन वर्षांपासून पॅरालिसिसमुळे (Paralysis) अंथरुणाला खिळून आहे. तिची मलमूत्राची घाण माझी बायको रोज काढते. जर वडिलांच्या संपत्तीचे तीन समान वाटे होत असतील, तर आज या कोर्टात माझ्या आईच्या जबाबदारीचे आणि या १३ लाखांच्या कर्जाचेही तीन 'समान वाटे' करून द्या! मी आजच घराची चावी त्यांना देतो!

कोर्टातील सन्नाटा आणि न्यायाधीशांचा तो ऐतिहासिक निर्णय :

अख्ख्या कोर्टरूममध्ये एकदम स्मशानशांतता पसरली. सुनीता आणि कविताच्या चेहऱ्याचा रंग उडाला. त्यांच्या नवऱ्यांनी (दाजींनी) एकमेकांकडे पाहिले आणि ते हळूच बहिणींच्या कानात पुटपुटले, आपल्याला हे घर नको आणि ती म्हातारीची जबाबदारी आणि कर्जही नको! तू केस मागे घे. बहिणींनी खाली मान घातली. त्यांना आपली चूक समजली होती.

हे सगळं बघून न्यायाधीश देशमुख साहेबांनी चष्मा काढला आणि ते अत्यंत कडक आणि भावूक आवाजात म्हणाले, आजकालच्या आधुनिक समाजाची हीच मोठी शोकांतिका आहे! कायद्याने तुम्हाला संपत्तीत समान 'हक्क' दिला आहे, पण आई-बापाची सेवा करण्याचं आणि जबाबदारी पेलण्याचं 'कर्तव्य' मात्र तुम्ही विसरलात! ज्या भावाने स्वतःचं आयुष्य जाळून बहिणींचे संसार उभे केले, त्या भावाला तुम्ही कोर्टाची पायरी चढायला लावलीत.

न्यायाधीशांनी बहिणींना उद्देशून पुढे म्हटले, जर तुम्हाला खरोखरच तुमचा कायदेशीर वाटा हवा असेल, तर आधी या कर्जाचे पैसे कोर्टात जमा करा आणि आईला पुढचे ४ महिने सांभाळण्याची लेखी हमी द्या, तरच मी संपत्तीच्या वाटपाचा आदेश देईन!

सुनीता आणि कविता ढसाढसा रडत कोर्टाच्या कठड्यातून बाहेर आल्या आणि त्यांनी थेट माधवचे पाय धरले!

दादा... आम्हाला माफ कर! लोकांच्या सांगण्यावरून आम्ही पैशांसाठी आंधळ्या झालो होतो. ज्या घराने आम्हाला लहानाचं मोठं केलं, ते घर तोडायला निघालो होतो. आम्हाला संपत्तीतली एक कवडीही नकोय, आम्हाला फक्त आमचा जुना 'दादा' हवाय!

माधवने आपल्या दोन्ही बहिणींना उठवून घट्ट मिठी मारली. कोर्टातील उपस्थित लोकांच्याही डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या. आज पैशांचा अहंकार हरला होता आणि रक्ताच्या नात्याचा, एका भावाच्या कष्टाचा विजय झाला.

# 'गारगाई' धरणासाठी पाच परदेशी कंपन्यांचा प्रतिसाद

## आठ तज्ज्ञांची नियुक्ती करण्याचा निर्णय

■ मुंबई

**बहुमताच्या** जोरावर स्थायी समिती आणि सभागृहात मंजुरी मिळालेल्या पालिकेच्या गारगाई धरण प्रकल्पाच्या कामाला आता वेग आला आहे. हे काम मिळविण्यासाठी पाच परदेशी कंपन्यांसह तीन भारतीय कंपन्या पुढे सरसावल्या आहेत.

परंतु ज्या कंपनीकडे तज्ज्ञांची टीम असेल अशा कंपनीचीच 'गारगाई' साठी निवड केली जाणार असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. धरण आणि टनेल बांधण्याचा अनुभव असणाऱ्या कंपन्यांना या कामासाठी प्राधान्य दिले जाणार आहे.

या धरण प्रकल्पाचे डिझाईन, सहा गावांचे पुनर्वसन, ३ लाखांहून अधिक झाडांचे पुनर्रोपण, धरणाची सुरक्षा या गोष्टींसाठी तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रकल्प कामासाठी इटली, जपान, नेदरलँड्स, स्पेन अशा पाच



विदेशी कंपन्यांसह भारतातील तीन कंपन्यांनी प्रतिसाद दिला असून, यापैकी ज्या कंपनीकडे तज्ज्ञांची टीम असेल त्या कंपनीची निवड केली जाईल. गारगाईतून मुंबईला ४४० दशलक्ष लीटर अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाचा खर्च ५३९६ हजार कोटी इतका असणार आहे. या प्रकल्पात सहा गावे बाधित होणार असून, त्या गावांचे वाडा तालुक्यातील देवळी गावात ३३४ हेक्टर जमिनीवर पुनर्वसन केले जाणार आहे, तर तीन लाख झाडे तानसा धरणाजवळ ५ किलोमीटर अंतरावर पुनर्रोपित करण्यात येणार आहेत.

# दापोलीतील कड्यावरच्या गणपती मंदिरात चोरी

■ रत्नागिरी

**दापोली** तालुक्यातील आंजर्ले येथील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कड्यावरचा गणपती मंदिरात चोरी झाल्याची घटना आज पहाटे उघडकीस आली. चोरट्यांनी मंदिर फोडून सुमारे ९० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. चार अज्ञात इसमांनी मंदिरात प्रवेश केला. त्यापैकी तिघांनी हत्याराचा वापर करत मंदिराच्या दर्शनी दरवाजाचे कुलूप व कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी वरच्या सभामंडपातील स्टीलची दानपेटी उचलून नेली. ही दानपेटी मंदिर परिसरातील शिवमंदिरासमोर असलेल्या त्रिपुराजवळील बुरुजाच्या खाली नेऊन फोडण्यात आली आणि त्यातील रोकड लंपास करण्यात आली.

# १ मे पासून किनवट तालुक्यात हमीभावाने मका, ज्वारी खरेदी

■ नांदेड

**नांदेड** जिल्ह्यातील किनवट तालुक्यात रब्बी हंगामातील मका व ज्वारी या भरड धान्य पिकांची शासकीय हमीभावाने खरेदी १ मेपासून सुरू होत आहे. यासाठी प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, येत्या काही दिवसांत नोंदणी सुरू होणार आहे. शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन उपप्रादेशिक व्यवस्थापक प्रफुल्ल एस.सोयाम यांनी केले आहे.

यंदा तालुक्यात मक्याची विक्रमी पेरणी झाली असून, तब्बल १० हजार १७३ हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यातील एकूण १५ हजार हेक्टर क्षेत्रांपैकी बहुतांश क्षेत्र किनवट तालुक्यात असल्याने तालुका मका उत्पादनात आघाडीवर आहे. हेक्टरी सरासरी ४० क्विंटल उत्पादन अपेक्षित असून एकूण उत्पादन ४ ते ५ लाख क्विंटलपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. तसेच, रब्बी ज्वारीची २ हजार ६३४ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे.

# सरकारने फरार गँगचे पालकत्व घेतले? अंबादास दानवेंचा सवाल

■ छत्रपती संभाजीनगर



**राज्यातील** कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून उबाठा गटाचे नेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. विविध गुन्ह्यांतील आरोपी अद्याप फरार असल्याने सरकार फरार गँगचे पालकत्व घेत आहे का? अशा सवाल त्यांनी केला. दानवे यांनी एक्स पोस्टमध्ये सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अंबादास दानवे पोस्टमध्ये म्हणाले की, एकीकडे कडक कारवाई, सखोल चौकशी आणि कठोर शासन करण्याची भाषा केली जाते. मात्र प्रत्यक्षात अनेक गंभीर प्रकरणांतील आरोपी अजूनही पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. नाशिकमधील लव्ह जिहाद प्रकरण, भोंदू अशोक खरात प्रकरण, संतोष देशमुख प्रकरण तसेच महादेव मुंडे प्रकरणातील आरोपी अद्याप फरार असल्याचे उदाहरण देत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

# तुळजाभवानी मंदिर परिसरात धूम्रपान! २४ जणांवर कारवाई

**तुळजापूर** - महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिर परिसरात धूम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी मोडल्या प्रकरणी प्रशासनाने धडक कारवाई करत एकाच दिवशी २४ जणांवर दंडात्मक कारवाई केली. या विशेष कारवाईदरम्यान मंदिर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन किंवा ते बाळगणाऱ्या व्यक्तींवर कोटपा कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे, मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयातच धूम्रपान करताना दोन जणांना रंगेहाथ पकडण्यात आले. या मोहिमेत एकूण २४ जणांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये मंदिर परिसरातील २२ आणि प्रशासकीय इमारतीतील २ व्यक्तींचा समावेश आहे.

# रत्नागिरीच्या चार तालुक्यांत १० टँकरने पाणीपुरवठा सुरू

■ रत्नागिरी

**मे महिना** सुरू व्हायला १५ दिवस बाकी असताना रत्नागिरी जिल्ह्यात पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यात रत्नागिरी, खेड, चिपळूण, मंडणगड तालुक्यांतील १६ गावांतील ३५ वाड्यांमध्ये १ शासकीय व ९ खासगी टँकर अशा १० टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

रत्नागिरी तालुक्यातील १६ गावांतील ३५ वाड्यांमध्ये भीषण पाणीटंचाई उद्भवली असून, त्यांना १० टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. रत्नागिरी-शिरगाव, नगर, सडामिऱ्या-चौसोपीवाडी, गवाणवाडी, मधलावठार, खालचावठार, मिऱ्याबंदर,



राधाकृष्णनगर तिबंडेवाडी, स्वरूपानंदनगर अजमेरीनगर, खालची राजनगर, प्रशांत खालगाव- बौद्धवाडीमधील गोताडवाडी, जाकादेवी बाजारपेठ मेर्वी-वरची म्हादवेवाडी, मिरजोळे- मधलीवाडी, भक्ती कुंज, एलिना, स्मित प्रभा, मंडणगड तालुक्यातील वाल्मिकी नगर, कोंडगाव, खेड-बोरटोक, धनगरवाडी, वरची धनगरवाडी, चिपळूण-डेरवण-धनगरवाडी, चव्हाणवाडी, कुडप-धनगरवाडी, कातळवाडी, अनारी-धनगरवाडी, कोंडमळा-धनगरवाडी, नारळेवाडी, राडेवाडी, अडरे-धनगरवाडी, सावर्डे-धनगरवाडी, टेरव-धनगरवाडी या गावे व वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे.

# मंत्रालय परिसरात सुरक्षा वाढ! एलिट गार्ड कमांडो तैनात

■ मुंबई

**मंत्रालय** परिसरात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. संभाव्य धोक्यांच्या पार्श्वभूमीवर मुख्य प्रवेशद्वारावर एलिट गार्डमधील प्रशिक्षित कमांडो तैनात करण्यात आले आहेत.

मंत्रालय परिसरात दहशतवादी कारवायांचा धोका असल्याच्या पार्श्वभूमीवर ही अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था करण्यात आल्याची माहिती आहे. मुख्य प्रवेशद्वार आणि गार्डन गेटवर प्रत्येकी एक-

## अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज

एक कमांडो तैनात असून, त्यांच्या हातात अत्याधुनिक शस्त्रास्त्रे देण्यात आली आहेत. मंत्रालय परिसरात आधीच तिहेरी सुरक्षा व्यवस्था आहे. बाहेरील भागात पोलीस चौकी, त्यानंतर राज्य राखीव पोलीस दलाचे जवान आणि आतल्या भागात पोलीस कर्मचारी तैनात असतात. तसेच साध्या वेशातील पोलीसही सतत गस्त घालत असतात.

आता या व्यवस्थेत एलिट गार्ड कमांडोंची भर पडली आहे. हे कमांडो मुख्यतः अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची सुरक्षा, दहशतवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर देणे आणि संवेदनशील ठिकाणांच्या संरक्षणासाठी विशेष प्रशिक्षित असतात. याशिवाय, अधिवेशन काळात विधान भवन परिसरात 'क्विक रिस्पॉन्स टीम'चे कमांडो देखील तैनात केले जातात.

मात्र, मंत्रालय परिसरात आता काही ठिकाणी एलिट गार्डची कायमस्वरूपी तैनाती करण्यात आल्याने सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.


# आजपासून भिवंडीत वज्रेश्वरी देवीचा पारंपारिक यात्रोत्सव

■ ठाणे

**भिवंडी** तालुक्यातील ऐतिहासिक वज्रेश्वरी योगिनी माता मंदिरात उद्या गुरुवार १६ एप्रिलपासून तीन दिवसीय पारंपारिक यात्रा व जत्रा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. तांसा नदीकाठावर वसलेल्या या जागृत देवस्थानच्या यात्रेत रेणुका माता, वज्राई माता आणि कालिका मातेच्या दर्शनासाठी भाविक गर्दी करतात.

हे मंदिर पेशवेकालीन असून, चिमाजी अप्पांनी याचा जिर्णोद्धार केला होता. उद्या गुरुवारी यात्रेच्या पहिल्या दिवशी सकाळी साडेसात वाजता देवीची महापूजा होईल. रात्री साडेनऊ वाजता दीपपूजा होईल. त्यानंतर शनिवार १८ एप्रिल रोजी मध्यरात्री १२ वाजल्यापासून श्रींचा पालखी सोहळा सुरू होईल.तरी भाविकांनी या यात्रा उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री वज्रेश्वरी योगिनी देवी संस्थानच्यावतीने करण्यात आले आहे. या मंदिराजवळच नैसर्गिक गरम पाण्याचे झरे आहेत. जिथे भाविक स्नान करतात.

# बांदा, दोडामार्ग तालुक्यातील गावांमध्ये माकडतापाचा संसर्ग



■ सिंधुदुर्ग

**जिल्ह्यातील** बांदा आणि दोडामार्ग तालुक्यात माकडतापाचे रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. बांदा परिसरात ५ रुग्ण आढळले असून, काही मृत माकडेही सापडली आहेत. गोचिडीमुळे पसरणाऱ्या या आजाराचा फैलाव रोखण्यासाठी सर्वेक्षण आणि जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली असून, जंगल परिसरात जाताना काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रमेश कर्तसकर यांनी सांगितले की, माकड ताप झालेल्या सर्व रुग्णांची प्रकृती उत्तम असून, त्यांची नियमित वैद्यकीय तपासणी सुरू आहे. याच कालावधीत काजू बागायतीत सहा माकडेदेखील मृतावस्थेत आढळली आहेत. मार्चच्या पहिल्या आठवड्यात बांदा निशाण परिसरातील काजू बागेत सातत्याने माकडे मृतावस्थेत आढळली होती.

त्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबूडकर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सई धुरी यांना याबाबत तत्काळ कार्यवाहीचे आदेश देऊन परिसरात सर्वेक्षण सुरू केले होते. यावेळी मृत माकडांच्या परिसरातील गोचिडी गोळा करत त्या तपासणीसाठी पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविल्या होत्या. प्राप्त अहवालात यातील ५० टक्के गोचिडी या दूषित आढळल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली.

# आंबेडकर जयंतीला गालबोट चंद्रपुरात तरुणाची हत्या

■ चंद्रपूर

**चंद्रपूर** शहरातील गांधी चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाला गालबोट लागले. रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास गांधी चौकात डीजेवर नाचताना झालेल्या किरकोळ वादातून ३६ वर्षीय रविकांत टेंभूरकर यांची हत्या करण्यात आली.

इंदिरानगर येथील भीम रत्न बहुउद्देशीय अनुयायी मंडळाच्या वतीने आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीदरम्यान डीजेच्या तालावर नाचताना युवकांमध्ये धक्काबुक्की झाली आणि त्यातून वाद निर्माण झाला. हा वाद इतका टोकाला गेला की पाच जणांनी मिळून रविकांतवर चाकूने वार केले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात येत असताना त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी एका अल्पवयीन आरोपीसह पाच जणांना अटक केली आहे.




# भांडुप बेस्ट बस अपघातातील चालकाचा जामीन अर्ज फेटाळला

■ मुंबई

**गेल्यावर्षी** डिसेंबर महिन्यात भांडुपमध्ये घडलेल्या बेस्ट बस अपघात प्रकरणी आरोपी बसचालक संतोष सावंत याचा जामीन अर्ज मुंबई सत्र न्यायालयाने फेटाळला. इलेक्ट्रिक बस चालवण्याचे प्रशिक्षण नसतानाही ती गाडी चालविण्याचे धाडस केले हाच मोठा गुन्हा असल्याचे निरीक्षण नोंदवित अतिरिक्त सत्र न्यायाधीश वाय. पी. मनतकर यांनी चालक सावंतला जामीन देण्यास नकार दिला.

२९ डिसेंबर २०२५ रोजी भांडुप रेल्वे स्थानकाजवळ बेस्ट बसचा भीषण अपघात झाला होता. चालकाचे या इलेक्ट्रिक बसवरील नियंत्रण नसल्याने घडलेल्या या अपघातात ४ जणांचा मृत्यू आणि अनेजण जखमी झाले होते. याप्रकरणी बसचालक संतोष सावंत यांच्यावर गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे. त्याने जामिनासाठी केलेल्या अर्जावर न्यायालयाने म्हटले की, हा सामान्य अपघात नसून गंभीर निष्काळजीपणा आहे. इलेक्ट्रिक बस चालविण्याचे प्रशिक्षण घेतले नसताना ती बस चालविण्याचे केलेले धाडस हाच मोठा गुन्हा आहे.

# रत्नागिरीतील गॅस टंचाईमुळे मराठी नाट्य संमेलन लांबणीवर

■ मुंबई

**यंदाच्या** १०१ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या रत्नागिरी येथे होणाऱ्या समारोपाच्या तारखांवरून गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. युद्धामुळे उद्भवलेली गॅस टंचाई आयोजकांचा चिंतेचा विषय बनल्याने हे प्रस्तावित नाट्य संमेलन लांबणीवर पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी बोरीवलीत होणाऱ्या या नाट्य संमेलनाचा मुहूर्तही लांबणीवर जाणार आहे. प्रस्तावित मराठी नाट्य संमेलनाचा समारोप रत्नागिरीमध्ये होणार आहे. परंतु सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली गॅस टंचाई आयोजकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. संमेलनासाठी येणाऱ्या हजारो रंगकर्मींच्या खानपानाची गैरसोय होऊ नये म्हणून आता या नाट्य संमेलनाचा समारोप सोहळा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मराठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह अजित भुरे म्हणाले की, नियामक मंडळाच्या सभेत चर्चा करूनच संमेलनाच्या नव्या तारखा जाहीर केल्या जाणार आहेत.

## नोटिस



याद्वारे कळविण्यात येते की, श्री. **राजु प्रधान** रा. **के. बी. भाभा होस्पिटल**, यांचा मृत्यू दि. **०२/११/२०२४** रोजी **बांद्रा (प) मुंबई ४०००५०** येथे झाला असून त्यांच्या मृत्यूची नोंद बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयात झाली नसल्याने मृत्यू नोंदणी आदेश निर्गमित करण्यासाठी तहसील अंधेरी कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

त्या अनुषंगाने कोणत्याही व्यक्तीचा आक्षेप असल्यास त्यांनी तहसीलदार अंधेरी यांचे कार्यालय, दादाभाई नौरोजी रोड, अंधेरी (प), मुंबई-४०००५८ यांचेकडे लेखी पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात संपर्क साधावा. अन्यथा प्रकरणी आक्षेप नाही असे समजून निर्णय घेण्यात येईल.

दिनांक : 15/04/2026 ठिकाण : अंधेरी

Sanju Jana - 7363004842

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# गुन्हेगारीची वाढती बेमुर्वतखोरी

देशातील विकसित राज्य म्हणून महाराष्ट्राचे कौतुक होत असते. परंतु गेल्या वर्षभरातल्या घटनांचा लेखाजोखा घेतला तर आर्थिकदृष्ट्या प्रगत असलेले हे राज्य कायदा सुव्यवस्थेच्याबाबतीत मात्र खूपच अविकसित आहे म्हणण्याची वेळ आलेली आहे. एकेकाळी बिहारमध्ये कायदा सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत वाईट होती. म्हणजे तिथे गुन्हेगारांचा हैदोस इतका होता की, सरकार तरी अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्न निर्माण व्हायचा. महाराष्ट्रातल्या कायदा सुव्यवस्थेचा धाक उरला नसल्याचे चित्र आज स्पष्टपणे दिसते आहे. अगदी गेल्या चार पाच दिवसांतल्या घटनांवर जरी नजर टाकली तरी त्याविषयी खात्री वाटू लागते. नाशिकमध्ये तीन आठवड्यांपासून अशोक खरात प्रकरण गाजते आहे. एकाच व्यक्तीवर वेगवेगळ्या प्रकारच्या फसवणुकीप्रकरणात पंधरा ते वीस गुन्हे दाखल होत आहेत. कदाचित हादेखील महाराष्ट्रातल्या एकाच व्यक्तीने केलेल्या गुन्ह्यांचा विक्रम ठरू शकतो. या प्रकरणाने राजकीय वातावरणही ढवळून निघाले असतानाच नाशिकमध्येच कॉर्पोरेट जिहादचे थैमान उजेडात आले. एका मोठ्या प्रतिष्ठित कंपनीमध्ये उघडपणाने धर्मांतराची केली जात असलेली सक्ती आणि त्यात आठ दहा मुलींना फसवण्याचे रचले गेलेले कारस्थान म्हणजे पुन्हा नाशिकमधल्या कायदा सुव्यवस्थेला धाब्यावर बसवण्याचा प्रकार ठरतो. या प्रकरणाचे अटकसत्र सुरू असतानाच आता अमरावतीजवळ परतवाडा येथे असाच दहा-बारा मुलींच्या लैंगिक शोषणाचा धक्कादायक प्रकार समोर आला. त्यातल्या आरोपीच्या अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर फिरवला गेला. म्हणजे अनधिकृत बांधकामेदेखील बिनधास्तपणे उभारली गेली होती. हे प्रकरण उजेडात आले नसते तर या अनधिकृत बांधकामाला धक्का लागला नसता. एका पाठोपाठ या घटना घडत असताना मुंबईत गोरेगावला नेस्को सेंटरमध्ये एका म्युझिक कॉन्सर्टमध्ये ड्रग आणि मादक पदार्थांची खुलेआम विक्री झाली. तिथे जमलेल्या तरुण-तरुणींनी संगीताच्या नावाने थैमान घालून बेफामपणे केलेले ड्रग सेवन त्यातल्या काही जणांच्या अंगाशी आले आणि त्यात एकाचा मृत्यू होण्याचाही प्रकार घडला. त्याच्यापाठोपाठ कोल्हापूरमध्ये एका फुल व्यापाराचे पंचवीस लाखांसाठी झालेले अपहरण आणि पुढच्या तासाभरातच त्याची झालेली हत्या ही सगळी गुन्ह्याची शृंखला कायदा सुव्यवस्थेलाच बेड्या ठोकणारी वाटू लागते.

### कॉर्पोरेट जिहाद ते परतवाड्यातले शोषण

गुन्ह्यांचे प्रमाण गेल्यावर्षीपेक्षा कमी झाल्याचा दावा राज्य सरकारकडून केला गेला आहे. परंतु गुन्ह्यांचे प्रमाण जरी कमी वाटत असले तरी गुन्ह्यांचे प्रकार अधिक गंभीर स्वरूपाचे वाटू लागतात. गुन्हे घडल्यानंतर त्याचे मोजमाप किंवा त्याच्या ताळेबंदावरून गुन्हेगारी वाढली की कमी झाली, यावर समाधान मानन्यापेक्षा गुन्हेगारी कितपत रोखली गेली हे अधिक महत्त्वाचे ठरते. म्हणजेच गुन्हेगारांना कायदा सुव्यवस्थेचा असा धाक वाटला पाहिजे की, त्यांना गुन्हे करण्याची हिंमत होता कामा नये. ज्यावेळेला इतक्या उघडपणाने आणि सर्रास एकापाठोपाठ गुन्हे घडतात त्यावेळेला गुन्हेगार किंवा समाजद्रोही प्रवृत्ती कायद्याची पत्रास ठेवायला तयार नाहीत हे सिद्ध होते. गेल्या आठ दहा वर्षांपासून अशोक खरातची ही व्हाईट कॉलर गुन्हेगारी सुरू होती. आणि कायदा सुव्यवस्था शहामृगी भूमिका घेऊन वाळूमध्ये डोके खुपसून बसली होती. तोच प्रकार कॉर्पोरेट जिहादच्याबाबतीत म्हणता येईल. ज्यावेळेला या प्रकरणाच्या तक्रारी आल्या. तेव्हा त्याची खातरजमा करून घेण्याकरीता साध्या वेशातल्या पोलिसांच्यावतीने गुप्तपणे तिथे नोकरी मिळवण्याचा प्रयत्न केला. ती मिळाल्यानंतर तिथे सुरू असलेली धर्मांतराच्या सक्तीचे प्रकरण उघडकीला आले. कॉर्पोरेटच्या या काचेच्या तावदानांमधल्या कार्यालयात घुसलेली ही जिहादी प्रवृत्ती कायद्याचा धाक नसल्यामुळेच इतका धिंगाणा घालू शकली. कोल्हापूरच्या फुल व्यापाराचे अपहरण होते काय, पंचवीस लाखांची मागणी केली जाते काय आणि तासाभरात त्याची हत्याही होते. हा सगळा प्रकार गुन्हेगारीच्या क्रूरतेचे प्रदर्शन करणारा आहे. ज्यावेळी या बेछूट प्रवृत्ती मोकाट सुटतात. त्याअर्थी त्यांना कायद्याचे कोणतेही भय वाटत नसते. उलट कायद्याची पार ऐशी तैशी करून स्वतःची दहशत आणि गुन्हेगारी व्यवस्था निर्माण करण्यात ते यशस्वी झाल्याचे म्हणावे लागते. परतवाड्यामध्ये असलेली अनधिकृत बांधकामे आणि तिथून चालणारे हे लैंगिक शोषण कायद्याचेच कुपोषण झाल्याचे सिद्ध करणारा ठरतो.

### नेस्को सेंटरचे नशासेंटर


गोरेगावच्या नेस्को सेंटरमधला रेव्ह पार्टीचा धिंगाणा पाहिला तर मुंबई ही ड्रग किंवा मादक पदार्थांना आंदण दिलेली महानगरी आहे असे म्हणण्याची वेळ येते. याठिकाणी होणारे कार्यक्रम पोलिसांच्या परवानगीने होतात. अशा कार्यक्रमांना होणारी गर्दी लक्षात घेऊन तिथे पोलीस बंदोबस्तही ठेवावा लागतो. म्हणजे पोलीस फौजफाटा असूनही त्या ठिकाणी पोहोचलेले ड्रग आणि त्याचे वेगवेगळ्या पद्धतीने तिथे धांगडधिंगा घालणाऱ्या तरुणांनी केलेले सेवन कायद्याचा चक्काचूर करणारा ठरतो त्यात एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याने हे प्रकरण अधिक गांभीर्याने लक्षात आले. ही घटना घडली नसती तर नेस्को सेंटरच्या या संगीतमय नशेमध्ये कशाकशाचे सेवन होते आहे, याचा बंदोबस्तावर आलेल्या पोलिसांनाही पत्ता लागला नसता. रात्रभर चाललेल्या या प्रकाराने एकूणच मुंबईतल्या तरुण वर्गावर ड्रग किंवा मादक पदार्थांनी जबरदस्त झडप घातली आहे हे सिद्ध होते. ज्या उघडपणाने नेस्को सेंटरमध्ये ड्रगची विक्री झाली किंवा सेवन झाले त्याचे प्रमाण पाहिले तर या नेस्को सेंटरचे नशा सेंटरमध्येच रूपांतर झाले होते असे म्हणावे लागते. मुंबईत गेल्या वर्षभरात पकडल्या गेलेल्या ड्रगची संख्या पाहिली तर जवळपास चाळीस हजार कोटींचे ड्रग जप्त झालेले आहेत मग अगदी न्हावा-शेवा बंदरातल्या कंटेनरमधून किंवा मुंबईच्या विमानतळावर होणारी त्याची तस्करी एवढेच नव्हे तर दोनच दिवसांपूर्वी नागपूर पोलिसांनी रेल्वेमध्ये एका बाईकडून शाम्पूच्या बाटलीत असलेले कोकेन जप्त करण्याचा प्रकारही एकूणच राज्यातल्या नशेखोरीवर प्रकाश टाकतो आणि या सर्व ठिकाणी कायदा अपुरा पडल्याचेच स्पष्ट होते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

माणसाने आयुष्यात नक्की झुकावे, पण योग्य त्या ठिकाणीच. नको तिथे झुकलात तर लोक लगेच पायदळी तुडवून मोकळे होतात.

## पंचांग



**गुरुवार १६ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

*** चैत्र कृष्ण चतुर्दशी**
*** नक्षत्र - उत्तरा भाद्रपदा**

**रवी उदय- ०६-२२**
**रवी अस्त- १८-५५**

**जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मीन**

अमावास्या प्रारंभ रात्री ८.११, सद्गुरू चिले महाराज पुण्यतिथी-पैजारवाडी

## पाककृती



### दही वडे



★**साहित्य** : २५० ग्रॅम उडीद डाळ, १ मोठा तुकडा आले, ३ हिरव्या मिरच्या, १ चमचा भाजलेले जिरे, १/२ किलो ताजा दही, २ वाटी तेल, १/३ टीस्पून हिंग, मीठ, १ टीस्पून तिखट, १ टीस्पून भाजलेले जिरे पावडर, ४-५ चमचे खजूर-इमली चटणी.

★**कृती**:- - २५० ग्रॅम उडीद डाळ रात्रभर भिजत ठेवा आणि नंतर सकाळी दोन वेळा धुवून बारीक करा. नंतर मिक्सरच्या ब्लेंडरमध्ये फिरवून त्यात एक मोठा तुकडा आले आणि तीन हिरव्या मिरच्या आणि एक चमचा भाजलेले जिरे घाला. एक मिनिट दही मिक्स करून बाजूला ठेवा.


नंतर अर्धा तास बाजूला ठेवा. नंतर कढईत २ वाटी तेल गरम करा आणि प्रथम वडाच्या मिश्रणात १/३ टीस्पून हिंग घाला आणि दोन मिनिटे ढवळून घ्या आणि वडे बनवा. सर्व वडे मध्यम/सिम आचेवर सोनेरी तपकिरी रंगापर्यंत तळणे. नंतर कोमट पाण्यावर भिजवा.

प्रथम वडे हाताने दाबल्यानंतर सर्व्हिंग बाऊलमध्ये ठेवा आणि नंतर मिश्रण केलेले दही झाकून ठेवा आणि मीठ, तिखट, भाजलेले जिरे पावडर आणि खजूर-इमली चटणी वरून घाला. खाण्यासाठी दही वडे तयार आहेत.

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




# तीन पराभवांनंतर मुंबई विजयाच्या शोधात

## वानखेडेवर आज पंजाब किंग्सशी भिडणार

**मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या २४ व्या सामन्यात जबरदस्त फार्मात असलेल्या अपराजित पंजाब किंग्सचा संघ मुंबई इंडियन्सला टक्कर देणार आहे. या हंगामातील दोन्ही संघांचा हा पाचवा सामना असून, सलग ३ पराभवांनंतर मुंबईचा संघ विजयाच्या शोधात आहे. तर पंजाब किंग्स आपली विजयी मालिका कायम ठेवणार आहे. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे मुंबईचा सलामीवीर फलंदाज रोहित शर्मा या सामन्यात खेळण्याची शक्यता कमी आहे.**



■ मुंबई

पाच वेळा विजेतेपद पटकावलेल्या मुंबई संघाने आयपीएलच्या या हंगामात आतापर्यंत ४ सामने खेळले आहेत. त्यातील पहिल्या सामन्यात दणदणीत विजय मिळवला. मात्र त्यानंतरचे ३ सामन्यांत मुंबईचा दारुण पराभव झाला. परिणामी आयपीएलच्या गुणतालिकेत मुंबई २ गुणांसह नवव्या स्थानावर आहे. पंजाबचा संघ या हंगामात चांगल्या स्थितीत आहे. पंजाबनेही ४ सामने खेळले आहेत. त्यात ३ सामन्यांत विजय मिळवला असून, एक सामना पावसामुळे रद्द झाला. त्यामुळे पंजाब ७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आयपीएलमध्ये दोन्ही संघ आतापर्यंत ३४ सामन्यांत भिडले आहेत. त्यातील दोन्ही संघांनी १७-१७ सामने जिंकले आहेत.

पॉवरप्लेमध्ये मुंबई फलंदाजांनी आणि गोलंदाजांनी अतिशय कामगिरी खराब केली आहे. मुंबईचे सलामीवीर भक्कम सुरुवात करून देण्यात अपयशी ठरले. ज्यामुळे फलंदाजींच्या मधल्या फळीवर दबाव येत आहे. अनुभवी सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी मोठ्या प्रमाणावर निराशा केली आहे. सूर्यकुमारने एक अर्धशतक झळकावले. मात्र तिलक वर्माने आतापर्यंत केवळ २०, ०, १४ आणि १ धावा केल्या. टी-२० विश्वचषकात चांगली कामगिरी करणाऱ्या इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू विल जॅक्सची अनुपलब्धता ही मुंबईसाठी आणखी एक समस्या आहे आणि त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागत आहेत. मुंबईचा अनुभवी गोलंदाज बुमराह धावा रोखण्यात यशस्वी ठरला आहे, तो ४ सामन्यांमध्ये एकही बळी घेऊ शकलेला नाही. बोल्ट आणि हार्दिक, मयंक मार्कंडे आणि मिचेल सँटनर यांनाही गोलंदाजीत चांगली कामगिरी करता आली नाही. श्रेयसच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्सने पुन्हा एकदा आपला चांगला फॉर्म कायम ठेवला आहे आणि त्यांना हरवणे एक कठीण आव्हान असेल. पंजाबच्या फलंदाजांनी आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. याची झलक हैदराबादविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात दिसली होती, पंजाबने पॉवरप्लेमध्ये एकही गडी न गमावता ९३ धावा ठोकल्या. प्रभसिमरन आणि प्रियांश यांची जोडी धोकादायक वाटते. श्रेयसचा आत्मविश्वास आणि कॉनोलीच्या आगमनाने संघ आणखी मजबूत झाला आहे. पंजाबच्या मुख्य गोलंदाज अर्शदीपने अद्याप सर्वोत्तम कामगिरी केलेली नाही.

## अजिंक्यतारा मल्लखांब स्पर्धेत ७०० खेळाडूंमध्ये चुरस होणार

मुंबई- बोरिवली पश्चिम येथील सुविद्या प्रसारक संघ, स्कूल ऑफ एन्व्हायरमेंट अ‍ॅण्ड आर्किटेक्चर व मल्लखांब लव संघांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ एप्रिलदरम्यान होणाऱ्या मुंबई विभागस्तरीय अजिंक्यतारा चषक मल्लखांब स्पर्धेत आयोजित ४० संघांतून ७०० हून जास्त खेळाडूंनी नोंद केली. या स्पर्धेचे उद्घाटन १७ एप्रिलला सायंकाळी ४ वाजता जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते होणार आहे. त्यासोबत आमदार अतुल भातखळकर, नगरसेविका सीमा शिंदे, श्वेता कोरगावकर, नगरसेवक तेजिंदर तिवाना यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ६, ८, १०, १२, १४, १६, १८ या वयोगटांत होणाऱ्या स्पर्धेत सर्व सहभागी खेळाडूंना अजिंक्यतारा पदक, सहभाग प्रमाणपत्र तसेच प्रत्येक वयोगटात सांघिक व वैयक्तिक विजेते अशी भरघोस पारितोषिके देण्यात येणार आहेत.

## युवा पलटन, मध्य रेल्वे आणि एचएएल संघांची विजयाने सुरुवात

■ मुंबई

**युवा** पलटन, मध्य रेल्वे, एचएएल-नाशिक यांनी ओम ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेल्या या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. वरळीच्या आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील मॅटवर झालेल्या 'अ' गटातील पहिल्या साखळी सामन्यात युवा पलटनने स्वामी समर्थ स्पोर्ट्सचा ५७-२६ असा सहज पराभव केला. युवा पलटनने विश्रांतीला २७-१६ अशी आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर मात्र टॉप गिअरवर पाय ठेवत सामना २९ गुणांच्या फरकाने खिशात टाकला. अभिषेक गुंगे, असलम इनामदार, वैभव दाभाडे या विजयाचे शिल्पकार ठरले.

मध्य रेल्वेने 'क' गटात रुपाली ज्वेलर्सचा ४६-१७ असा पाडाव केला. पूर्वार्धात आक्रमक खेळ करत २७-१७ अशी आघाडी घेणाऱ्या रेल्वेने उत्तरार्धात सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. श्रीकांत जाधव, विनोद अत्याळकर यांच्या सुरुवातीच्या आक्रमक खेळाला या विजयाचे श्रेय जाते.

## रा. फ. नाईक, टागोर नगर, ज्ञानशक्ती युवा, उत्कर्ष मंडळ, जय बजरंगची विजयी सलामी



■ ठाणे

**१०१ व्या** वर्षात पदार्पण करणाऱ्या श्री मावळी मंडळाच्या ७३ व्या राज्यस्तरीय महिला गट कबड्डी स्पर्धेत रा. फ. नाईक, टागोर नगर मित्र, ज्ञानशक्ती युवा यांनी विजयी सलामी दिली. उत्कर्ष मंडळ, जय बजरंग संघांना पहिल्या फेरीत विजय मिळवण्यासाठी ५-५ चढायांचा डाव खेळावा लागला.

महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन व ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ठाण्यातील मावळी मंडळाच्या चरई येथील पटांगणार आजपसून सुरू झालेल्या महिलांच्या सामन्यात रा. फ. नाईक संघाने शताब्दी स्पोर्ट्सचा प्रतिकार ३४-३० असा मोडून काढला. रेखा चिकणे, भारती शेळके यांच्या चढाई पकडीच्या खेळमुळे रा. फ. नाईकने पूर्वार्धात लोण देत २१-१४ अशी आघाडी घेतली. पण उत्तरार्धात शताब्दीच्या नंदिनी मौर्या, अनघा गायकवाड यांनी आपला खेळ गतिमान करत लोणची परतफेड करत सामन्यात चुरस निर्माण केली, पण संघाला विजयी करण्यात त्या अपयशी ठरल्या. उपनगरच्या टागोर नगर मित्र मंडळाने ठाण्याच्या प्रेरणा कलाला २७-२३ असे नमवत आगेकूच केली. ठाण्याच्या ज्ञानशक्ती युवाने उपनगरच्या स्वस्तिक मंडळावर ४७-२८ अशी मात केली.

विश्रांतीला २ लोण देत २९-१४ अशी आघाडी घेणाऱ्या ज्ञानशक्तीने विश्रांतीनंतर आणखी एक लोण देत आपला विजय सोपा केला. हिमानी गायकवाड, यतिक्षा बागडे, पौर्णिमा देवरे यांच्या झंझावाती खेळाने ज्ञानशक्तीला १९ गुणांच्या फरकाने विजय मिळविता आला. पुरुषांच्या लढती मात्र पहिल्या फेरीपासून चुरशीच्या झाल्या.

## एसएनडीटीतर्फे राज्यात प्रथमच महिला आंतरविद्यापीठीय खो-खो स्पर्धा होणार

■ मुंबई

**एसएनडीटी** विद्यापीठाच्या वतीने महाराष्ट्रात प्रथमच महिला गटाची राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव यांनी दिली. ही स्पर्धा एसएनडीटी विद्यापीठाच्या जुहू येथील संकुलात १९ ते २३ एप्रिल दरम्यान खेळण्यात येईल. या ५ दिवसांत हे सामने सकाळी ७ ते १० आणि सायंकाळी ४ ते ९ वाजेपर्यंत असे दोन सत्रांत होतील. या स्पर्धेचे उद्घाटन १९ एप्रिलला सायंकाळी ६ वाजता होईल. स्पर्धेचा समारोप सोहळा २३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता होईल.

यासंदर्भात डॉ. कविता खोलगाडे म्हणाल्या की, अखिल भारतीय विद्यापीठ संघ मार्गदर्शक तत्वानुसार विभागीय स्पर्धेत पहिल्या ४ क्रमांकात स्थान मिळवणाऱ्या चार संघांना प्रवेश देण्यात आला. त्यात पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर विभागांतील एकूण सोळा संघ विजेतेपदासाठी लढत देतील. या स्पर्धेसाठी दोन मैदाने तयार करण्यात आली असून, स्पर्धेतील सामने सकाळ, आणि संध्याकाळच्या सत्रात खेळण्यात येणार आहेत.


## मार्श मॅकलेनन संघाने विजेतेपद पटकाविले

■ ठाणे

**मार्श** मॅकलेनन संघाने अप्लाईड क्लाऊड कॉम्प्युटिंग संघाचा ११० धावांनी पराभव करत आंतर कार्यालयीन टी-२० क्रिकेट स्पर्धेतील 'क' गटाचे विजेतेपद संपादन केले. विजयासाठी १९९ धावांचा पाठलाग करणाऱ्या अप्लाईड क्लाऊड कॉम्प्युटिंग संघाला ८९ धावांवर गुंडाळत मार्श मॅकलेनन संघाने विजय निश्चित केला. प्रदिप शर्मा, चिन्मय कदम आणि हर्ष मिश्राने बऱ्यापैकी फलंदाजी करत संघाला दीड शतकी धावसंख्या उभारुन दिली. प्रदीपने ३८, चिन्मयने नाबाद ३७ आणि हर्षने २२ धावा केल्या. या डावात पराभूत संघाच्या अजिंक्य पवारने ३ बळी मिळवले. तर सोनू जयस्वाल, प्रतिक भोसले, देवकिरण चेट्टी, ओमकार सावंत आणि वैभव मुजगेने प्रत्येकी १ फलंदाज बाद केला.

## राज्य अजिंक्य कॅरम स्पर्धेत पुण्याचा पुरुष संघ विजयी

■ नवी मुंबई




वाशीतील नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन येथे सुरू असलेल्या ६० व्या वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेतील महिला सांघिक गटात पुण्याच्या पुरुष संघाने ठाण्याच्या संघाचा २-१ असा पराभव करून या गटाचे विजेतेपद पटकावले. पुण्याच्या अनिल मुंढे आणि रहीम खान जोडीने ठाण्याच्या पंकज पवार आणि समीर अंसारीला २५-१३, १६-१३ असे सरळ दोन सेटमध्ये हरवून आपल्या संघाला चांगली सुरुवात करून दिली होती. परंतु ठाण्याच्या झैद अहमद फारुकीने पुण्याच्या अभिजित त्रिपनकरवर पहिला सेट ९-२५ असा गमावूनही पुढील दोन सेट २५-१२, २३-१० असे जिंकून सामन्यात बरोबरी केली व सामना १-१ असा झाला. मात्र माजी विश्वविजेत्या पुण्याच्या योगेश परदेशीने आपल्या अनुभवाच्या जोरावर नवोदित कुणाल राऊतला ३ सेटनंतर ८-२५, २५-८ आणि २५-१२ असे चीत करून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत रत्नागिरीने बाजी मारली. रत्नागिरीने मुंबई संघाला २-१ असे हरवून तिसरा क्रमांक प्राप्त केला. मुंबईच्या प्रशांत मोरेने एकमेव विजय नोंदवताना रत्नागिरीच्या अभिषेक चव्हाणला २३-८, १५-१५ असे हरवले.

नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in




## मोहित-अहान पुन्हा एकत्र

बॉक्स ऑफिसवर यशाचे नवे मापदंड प्रस्थापित करणाऱ्या 'सैय्यारा' चित्रपटातून अहान पांडे आणि अनीत पड्डा या दोन नव्या ताऱ्यांचा उदय झाला. 'सैय्यारा'च्या अभूतपूर्व यशानंतर अहानच्या आगामी प्रकल्पांबद्दल चित्रपटसृष्टीत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. सध्या तो यशराज फिल्म्स आणि अली अब्बास जफर यांच्या आगामी चित्रपटाचे चित्रीकरण करत आहे. यानंतर अहान पुन्हा एकदा आपल्या 'मेंटॉर'कडे म्हणजेच मोहित सूरीकडे वळणार असल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, मोहित सूरी सुरुवातीला एका वेगळ्या विषयावर चित्रपट बनवण्याच्या विचारात होते. मात्र, काही तांत्रिक कारणांमुळे त्यांनी या प्रकल्पाची फेररचना केली आणि अहान पांडेला समोर ठेवून एक नवी पटकथा तयार केली. हा चित्रपट 'सैय्यारा'चा पुढचा भाग नसून, एका 'ट्विस्टेड' प्रेमकथेवर आधारित असणार आहे. यामध्ये प्रेमातील गुंतागुंत आणि टोकाचा संघर्ष पाहायला मिळेल. या चित्रपटात अहान पांडे आपल्या 'लव्हर बॉय' या प्रतिमेतून बाहेर पडून एका तीव्र आणि रागीट भूमिकेत दिसणार आहे. आदित्य चोप्रा यांची निर्मिती असलेला हा चित्रपट 'सैय्यारा'पेक्षा पूर्णपणे वेगळ्या विश्वात प्रेक्षकांना घेऊन जाणारा असेल, असे सांगण्यात येत आहे.



## वरुण, मृणाल आणि पूजाचा प्रेमत्रिकोण

ज्येष्ठ दिग्दर्शक डेव्हिड धवन पुन्हा एकदा आपल्या खास शैलीतील विनोदी चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. वरुण धवन, पूजा हेगडे आणि मृणाल ठाकूर यांची मुख्य भूमिका असलेल्या 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटाचा पहिला लूक आणि टिझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला. रोमान्स, गोंधळ आणि निखळ मनोरंजन यांचे मिश्रण असलेला हा चित्रपट उन्हाळ्याच्या सुट्टीत प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे. डेव्हिड धवन यांचा दिग्दर्शक म्हणून हा ४६ वा चित्रपट आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाच्या टिझरची सुरुवात दोन लहान मुलांच्या दृष्टिकोनातून करण्यात आली आहे, ज्यामुळे कथानकात एक वेगळीच उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटाच्या टिझरमध्ये वरुण धवन 'जस'च्या भूमिकेत दिसत असून, मृणाल ठाकूर 'बानी' आणि पूजा हेगडे 'प्रीत' या पात्रांच्या रूपात समोर आल्या आहेत. या तिघांमधील प्रेमत्रिकोणासोबतच कथानकात 'डबल ट्रबल' असल्याचे संकेत मिळाले आहेत. डेव्हिड धवन यांच्या चित्रपटांचे वैशिष्ट्य असलेली दुहेरी ओळख किंवा नात्यांमधील गुंतागुंत याही चित्रपटात पाहायला मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

## नेहाच्या '५२ ब्लू'चा फर्स्ट लूक

बॉलिवूडमधील अष्टपैलू अभिनेत्री नेहा धुपिया आता जागतिक सिनेसृष्टीत पदार्पण करण्यास सज्ज झाली आहे. तिच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा, म्हणजेच '५२ ब्लू'चा पहिला लूक आणि ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. या चित्रपटात नेहा आजवरच्या तिच्या कारकिर्दीतील अत्यंत वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेत दिसणार असून, तिने पहिल्यांदाच पडद्यावर पूर्णपणे 'डी-ग्लॅम' (साधा) अवतार स्वीकारला आहे. प्रसिद्ध इजिप्शियन दिग्दर्शक अली अल अरबी यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला हा चित्रपट एका भारतीय फुटबॉलप्रेमी तरुणाचा प्रवास मांडतो. २०२२ च्या कतार फिफा विश्वचषकासाठी स्थलांतरित कामगार म्हणून गेलेल्या या तरुणाची ही संघर्षगाथा आहे. ओळख, आकांक्षा आणि जिद्द अशा विषयांभोवती फिरणाऱ्या या चित्रपटाची कथा एका भावनिक कौटुंबिक पार्श्वभूमीवर आधारित आहे. या चित्रपटात नेहा धुपिया आणि ज्येष्ठ अभिनेते आदिल हुसेन पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करत असून ते पती-पत्नीच्या भूमिकेत दिसतील.



## 'मातृभूमी' रखडणार?

बॉलिवूडचा 'भाईजान' सलमान खानच्या आगामी 'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस' या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत सध्या मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. सुरुवातीला एप्रिलमध्ये आणि त्यानंतर जूनमध्ये प्रदर्शित होण्याचे संकेत असतानाही, आता तांत्रिक आणि नियामक कारणांमुळे हा चित्रपट रखडल्याची माहिती समोर येत आहे. महत्त्वाचे म्हणजे, हा चित्रपट अद्याप प्रमाणपत्रासाठी केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडे (सेन्सॉर बोर्ड) सादर करण्यात आलेला नाही.

मुळात हा चित्रपट २०२० मधील भारत आणि चीन यांच्यातील गलवान खोऱ्यातील संघर्षावर आधारित होता. मात्र, डिसेंबर २०२५ मध्ये या चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झाल्यानंतर चीनमधील सरकारी प्रसारमाध्यमांनी यावर तीव्र आक्षेप घेतला होता. या पार्श्वभूमीवर, दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंध सुधारत असताना, भारतीय प्राधिकरणांनी निर्मात्यांना चीन आणि गलवान संदर्भातील थेट उल्लेख टाळण्याचा अनौपचारिक सल्ला दिला होता. त्यानंतर चित्रपटाचे नाव बदलून 'मातृभूमी' असे करण्यात आले. आता हा चित्रपट केवळ युद्धपट न राहता एका मानवी भावनांच्या संघर्षावर (ह्युमन ड्रामा) आधारित कथानकात रूपांतरित झाला आहे. चीन आणि गलवानचा संदर्भ काढल्यानंतर नेमका संघर्ष कोणाशी आहे, हा प्रश्न निर्मात्यांसमोर उभा ठाकला आहे. या बदलांनंतर चित्रपटाचा दर्जा आणि प्रवाहीपणा टिकवण्यासाठी निर्माते सध्या प्रयत्न करत आहेत. अद्याप संरक्षण मंत्रालय, भारतीय सैन्य किंवा सेन्सॉर बोर्डापैकी कोणाही हा चित्रपट पाहिलेला नाही. या सर्व विभागांची परवानगी मिळाल्यानंतरच प्रदर्शनाची पुढील दिशा स्पष्ट होणार आहे. त्यामुळे, सलमान खानच्या चाहत्यांना 'मातृभूमी' पाहण्यासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागण्याची दाट शक्यता आहे.




## 'फोर्स ३'च्या चित्रीकरणास प्रारंभ




बॉलिवूडमधील अत्यंत यशस्वी ॲक्शन-थ्रिलर फ्रँचायझींपैकी एक असलेल्या 'फोर्स' या चित्रपटाचा तिसरा भाग आता प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. 'फोर्स ३'च्या चित्रीकरणाला आता अधिकृतपणे सुरुवात झाली असून, निर्मात्यांनी या संदर्भात एक उत्कंठावर्धक घोषणा करणारा व्हिडिओ प्रदर्शित केला आहे. या भागात जॉन अब्राहमसोबतच अभिनेता हर्षवर्धन राणे मुख्य भूमिकेत झळकणार असल्याने चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. 'खाकी: द बिहार चॅप्टर' आणि 'द फ्रीलान्सर' यांसारख्या गाजलेल्या वेब मालिकांचे दिग्दर्शन करणाऱ्या भाव धुलिया यांच्याकडे या चित्रपटाची धुरा सोपवण्यात आली आहे.

पहिल्या दोन भागांप्रमाणेच याही भागात जबरदस्त ॲक्शनचा तडका पाहायला मिळेल, असा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला आहे.

या चित्रपटात जॉन अब्राहम पुन्हा एकदा एसीपी यशवर्धन सिंग या आपल्या कणखर भूमिकेत दिसणार आहे. त्याच्या जोडीला अलीकडेच बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरलेला हर्षवर्धन राणे एका महत्त्वाच्या भूमिकेत प्रवेश करत आहे. त्याच्या भूमिकेबाबत अद्याप गुप्तता पाळली असली, तरी जॉनने त्याला एक नवा 'ॲक्शन हिरो' म्हणून सादर करण्यास उत्सुक असल्याचे म्हटले आहे.




## 'रामायण'नंतर 'ब्रह्मास्त्र २'चा श्रीगणेशा

भारतीय सिनेसृष्टीतील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या 'ब्रह्मास्त्र'च्या दुसऱ्या भागाची प्रतीक्षा करणाऱ्या चाहत्यांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. लास वेगास येथे पार पडलेल्या 'सिनेकॉन २०२६' सोहळ्यात निर्माते नमित मल्होत्रा यांनी 'ब्रह्मास्त्र २' बाबत मोठी घोषणा केली आहे. 'रामायण' या महाकाव्यावर आधारित चित्रपटाचे काम पूर्ण झाल्यानंतर या चित्रपटाच्या कामाला गती दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'ब्रह्मास्त्र'च्या पहिल्या भागाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते. या चित्रपटाच्या शेवटी देव आणि अमृता यांच्या कथेचे संकेत देण्यात आले होते. तेव्हापासूनच या त्रयीच्या दुसऱ्या भागाबाबत उत्सुकता होती. दिग्दर्शक अयान मुखर्जी गेल्या काही काळापासून यावर काम करत असल्याचे संकेत मिळत होते, मात्र आता नमित मल्होत्रा यांनी यावर शिक्कामोर्तब केले आहे.

## पाटण तालुक्यात प्रसिद्ध असलेल्या नावडीच्या घाटाला धोबीघाटाचे स्वरूप

■ पाटण

**सध्या** तालुक्यात उन्हाळी यात्रा हंगाम सुरू होत असताना कोयनेच्या काठावर विभागातील लोकांनी कपडे धुण्यासाठी मोठी गर्दी केल्याने या पाणवठ्याला धोबी घाटाचे स्वरुप आले आहे. नावडी पाणवठ्यावर स्वच्छ, सुंदर कोयनामाईचे पसरलेले पाण्याचे पात्र, आजूबाजूचा निसर्गसौंदर्याने नटलेला परिसर यामुळे येथे लहान-मोठ्या सिनेमांचे चित्रीकरणही झाले आहे.

पाटण तालुक्यात सध्या यात्रा व लग्न हंगाम सुरू झाला आहे. याकरिता घरोघरी साफसफाई रंगरंगोटी व घरातील लहान-मोठ्या कपड्यांची धुण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. निसरे-नावडी नदी पाणवठा हे एक प्रसिद्ध ठिकाण आहे.या कोयना नदी पात्रात धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात नदी ओसंडून वाहत आहे. या बारमाही वाहत्या पाण्याचे आकर्षण मल्हारपेठ, मारुल हवेली, नाडे, विहे, उरुल, ठोमसे, बेलदरे विभागातील लोकांना लागले असून लांबून लोक हे लहान-मोठ्या गाड्या भरून कपडे धुण्यासाठी आंघोळीसाठी दिवसभर आनंद घेत आहेत. याठिकाणी प्रशस्त जागा, कपडे धुण्यासाठी मोठे खडक, गाडी पार्किंग करणे, कपडे वाळत घालणे व नदीकाठी सावलीला जेवणाचा, मेजवानीचा, पर्यटनाचा अनोखा आनंद लुटण्यासाठी प्रशस्त जागा असल्याने लोक पहाटेपासून गर्दी करत आहेत.

## सिडकोत शिंदे गटाच्या विभागप्रमुखावर हल्ला

■ नाशिक

**नाशिकच्या** सिडको परिसरात शिंदे गटाचे विभागप्रमुख सुयश पाटील यांच्यावर काही हल्लेखोरांनी कोयत्याने हल्ला केला. या हल्ल्यात सुयश पाटील गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ व्हायरल झाला.

सुयश पाटील हे दत्त चौकातील आपल्या कार्यालयासमोर खुर्चीवर बसले होते. त्यावेळी संशयित आरोपी पंकज सोनवणे, विजय कांची, वैभव निकम आणि त्यांच्या सोबत असलेल्या इतर ४ ते ५ जणांनी सुयश पाटील यांना गाठले.

जुन्या वादातून या टोळक्याने पाटील यांच्यावर कोयत्याने वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे पाटील सुरुवातीला गोंधळले. त्यांनी स्वतःचा बचाव करत तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. कोयत्याच्या एका वारामुळे ते खाली पडले. यानंतर हल्लेखोरांनी त्यांच्या कार्यालयाचीही मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली.

## नूतनीकरण केलेल्या परेल रेल्वे स्थानकाचा काही भाग पाडणार




■ मुंबई

वर्षभरापूर्वी १९ कोटी खर्च करून नूतनीकरण केलेल्या मध्य रेल्वे मार्गावरील परेल स्थानकाचा काही भाग पाडण्यात येणार आहे. कुर्ला-परेल पाचव्या आणि सहाव्या मार्गिकांसाठी हे पाडकाम करावे लागणार आहे. या मार्गिकांमुळे प्रस्तावित परेल टर्मिनस आणि जुने परेल वर्कशॉप जोडले जाणार आहे.

या प्रकल्पाशी संबंधित एका अधिकाऱ्याने ही माहिती दिली आहे. जर या पाचवी-सहावी मार्गिका प्रकल्पाचा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत विस्तार करण्यात आला तर कदाचित संपूर्ण परेल रेल्वे स्थानक पाडावे लागेल, असे या अधिकाऱ्याने सांगितले.

केंद्र सरकारच्या अमृत भारत योजनेअंतर्गत परेल स्थानकाचे एक वर्षापूर्वी नूतनीकरण करण्यात आले आहे. स्थानकावर प्रवाशांसाठी अनेक सुविधा निर्माण करण्यात आल्या. आरक्षण कार्यालय, स्वच्छतागृह यांचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. प्रवाशांसाठी फलाटावर बसण्याची व्यवस्थादेखील करण्यात आली आहे. या सर्व सुविधांवर १९ कोटी रुपये खर्च करण्यात आले. या सर्व सुविधा पाडकामात नष्ट होणार आहेत.

नव्या प्रकल्पाबाबत बोलताना रेल्वेच्या एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले की, सुमारे १७ वर्षे रखडलेल्या या प्रकल्पाला नुकतीच मंजुरी मिळाली आहे. या नव्या मार्गिकेसाठी परेल रेल्वे स्थानकाचा काही भाग पाडावा लागणार आहे.

## अकोल्यात काँग्रेसच्या स्वीकृत नगरसेवकाच्या वाहनावर हल्ला

■ अकोला

**अकोला** शहरात काँग्रेसचे स्वीकृत नगरसेवक आकाश कवडे यांच्या वाहनावर अज्ञातांकडून हल्ला केला. घरासमोर उभ्या असलेल्या त्यांच्या मोटारीच्या पाठीमागील काचा फोडण्यात आल्या.

ही घटना डाबकी रोड पोलीस स्टेशन हद्दीत घडली. घटनेच्या वेळी आकाश कवडे हे घरातच उपस्थित होते. अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या घरासमोर उभी असलेल्या कारच्या काचा फोडल्या. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. आकाश कवडे हे काँग्रेसचे स्वीकृत नगरसेवक असून ते युवक काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष तसेच अकोला युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आहेत.

या घटनेची माहिती समजताच काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांच्या घरासमोर मोठी गर्दी केली. या प्रकरणी पोलिसांत तक्रार नोंदवण्यात आली. या घटनेनंतर काँग्रेस पक्ष संतप्त झाला असून, हल्लेखोरांचा तत्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## पालिका स्थायी समिती सभागृहातून नगरसेविकेचे २० हजार लंपास



■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात चोरीची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. उबाठाच्या प्रभाग क्रमांक ५६ च्या नगरसेविका लक्ष्मी भाटिया यांच्या पर्समधून २० हजार रुपये चोरीला गेले. महापालिकेची 'तिजोरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणीच ही घटना घडल्याने सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थायी समितीची बैठक संपल्यानंतर लक्ष्मी भाटिया या जेवणासाठी बाहेर गेल्या होत्या. त्यावेळी सभागृहात ठेवलेल्या त्यांच्या पर्समधून अज्ञात व्यक्तीने रोख रक्कम चोरल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. जेवण करून परतल्यानंतर पर्समध्ये छेडछाड झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या घटनेची माहिती मिळताच सुरक्षा विभाग आणि पोलिसांना कळवण्यात आले. मात्र, स्थायी समिती सभागृहात सीसीटीव्ही कॅमेरेच नसल्याने आरोपींचा माग काढणे कठीण होत आहे.

या घटनेनंतर संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत लक्ष्मी भाटिया म्हणाल्या की, स्थायी समिती म्हणजे महापालिकेची तिजोरी मानली जाते. याच ठिकाणी असा प्रकार होत असेल, तर सुरक्षेबाबत काय म्हणायचे? मनसे गटप्रमुख यशवंत किल्लेदार यांनीही या घटनेवरून पालिकेवर टीका करत, सभागृहातच सुरक्षेची अवस्था अशी असेल, तर सामान्य मुंबईकरांच्या सुरक्षेचे काय?असा टोला लगावला.

## जळगाव शालार्थ घोटाळ्यात ४८ अधिकाऱ्यांना नोटीस

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यात उघडकीस आलेल्या शालार्थ घोटाळ्याच्या तपासाला वेग आला. नाशिक एसआयटीने शिक्षण विभागातील तब्बल ४८ अधिकाऱ्यांना सुनावणीसाठी नोटिसा बजावल्या आहेत. या प्रकरणात माध्यमिक शिक्षण विभागातील आजी-माजी शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, कक्षाधिकारी वरिष्ठ व कनिष्ठ सहाय्यकांचा समावेश आहे.

तपासादरम्यान जिल्ह्यातील काही शाळांनी कोणतीही पडताळणी न करता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केल्याचे निष्पन्न झाले. बनावट कागदपत्रांच्या आधारे ६०० हून अधिक शिक्षकांचे बनावट आयडी तयार करून कोट्यवधी रुपयांचा पगार लाटल्याचे उघड झाले. या घोटाळ्याच्या अनुषंगाने २०२५ मध्ये आर्थिक गुन्हे शाखेने जळगावात येऊन १० शाळांच्या मुख्याध्यापक आणि संस्थाचालकांची चौकशी केली.

## पिंपरी-चिंचवडमध्ये आंब्याचे आमिष दाखवून मुलीवर अत्याचार

■ पिंपरी

**पिंपरी-** चिंचवडच्या एकतानगर भागात माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना उघडकीस आली. केवळ अडीच वर्षांच्या चिमुरडीला आंब्याचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी ४७ वर्षीय विजय भोसले या नराधमाला काळेवाडी पोलिसांनी अटक केली आहे.

दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली. आरोपीने पीडित मुलीला आंबा खायला देण्याच्या बहाण्याने आपल्या खोलीत बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. सकाळी चिमुरडीला त्रास होऊ लागल्याने पालकांनी तिला तातडीने महापालिकेच्या रुग्णालयात दाखल केले. तिथे डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

आईने विश्वासात घेऊन विचारले असता, मुलीने आरोपीने घरात बोलावून अत्याचार केल्याचे सांगितले. घटनेचे गांभीर्य ओळखून रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी तत्परता दाखवत एक पथक रुग्णालयात तर दुसरे पथक आरोपीच्या घरी पाठवून त्याला तातडीने अटक केली.

## बीकेसीत हेलिपॅड आणि क्लबहाऊस ८० वर्षांसाठी भाडेपट्टी मंजूर

■ मुंबई

**बीकेसी** म्हणजे बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे हेलिपॅड, क्लबहाऊस आणि सार्वजनिक सुविधा असलेल्या मोठ्या पायाभूत व मनोरंजन प्रकल्पाला ८० वर्षांच्या भाडेपट्ट्याची मंजुरी मिळाली आहे. मिठी नदीकिनारी नियोजित हा विकास प्रकल्प १,०८,५४६.५१ चौरस फूट क्षेत्रफळावर उभारला जाणार आहे.

एमएमआरडीए म्हणजेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने फेब्रुवारी २०२४ मध्ये बीकेसीच्या जी-ब्लॉकमधील राखीव मनोरंजन भूखंडावर दोन हेलिपॅडसह क्रीडा सुविधा असलेले क्लबहाऊस उभारण्यासाठी निविदा काढली होती. हा प्रकल्प डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट आणि ट्रान्सफर (डीबीएफओटी) मॉडेलअंतर्गत राबविण्यात येणार असून तो एकात्मिक विकास योजनेचा भाग आहे. निवडलेल्या खासगी विकासकाने भाडेपट्टा प्रीमियमपैकी सुमारे ७० टक्के रक्कम आधीच भरली आहे. उर्वरित रक्कम भरल्यानंतर भाडेपट्टा करार केला जाईल आणि त्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होईल.


## परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणातील मुख्य आरोपीच्या घरावर बुलडोझर

■ अमरावती

**परतवाडा**-अचलपूर परिसरात उघडकीस आलेल्या लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेल प्रकरणात प्रशासनाने कठोर कारवाई करत मुख्य आरोपी मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर याच्या घराचा काही भाग बुलडोझरने पाडला.

अचलपूर नगरपरिषदेने संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे आढळल्यानंतर यापूर्वी नोटीस बजावली होती. मात्र, दिलेल्या मुदतीत कारवाई न केल्याने अखेर नगरपरिषदेकडून घरावर ही कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे घटनास्थळी उपस्थित होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या गंभीर प्रकरणात आरोपी तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे लैंगिक शोषण करत होते. तसेच त्यांचे अश्लील व्हिडिओ तयार करून त्याद्वारे ब्लॅकमेल केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात आतापर्यंत मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीरसह उजेर खान इकबाल खान, तरबेज खान तस्लिम खान आणि मोहम्मद साद मोहम्मद सादिक या चार आरोपींना अटक करण्यात आली.

# नवाकाळ शब्दकोडे– १५७७



**आडवे शब्द –**

१. करकर वाजणारा वहाणेचा प्रकार ४. 'नाही खर्चली कवडी दमडी, नाही वेचला दाम ×× × ××× ××× ××'- जगाच्या पाठीवर चित्रपटातील लोकप्रिय गीत ९. वाईट कृत्य ११. रथ हाकणारा १२. नलराजाची पत्नी १४. व्याकूळता, अस्वस्थता १७. अनुमोदन १८. शिवीगाळ १९. भेग २०. आई २१. तपशीलवार २३. हल २४. अफवा २६. महाराणा प्रताप यांचा घोडा २८. पंख २९. नागाची मादी, एक विषाणूजन्य विकार ३१. पुष्कळ ३३. या ठिकाणी ३४. भयभीत ३५. सुलटाच्या विरूद्ध ३६. पहारा ३८. खूप ३९. झाड ४०. कमनशिबी ४३. घट्ट ४५. पकडणे, विरोध दर्शवणारे आंदोलन ४७. अडगळीची जागा ५०. बिनचूक, नियम न मोडता, ठरल्यानुसार ५५. इंद्र ५८. वाया, व्यर्थ ५९. खळबळजनक ६१. तांबडा ६२. बातमी ६३. गणपती ६४. खिन्न ६५. तमाशा ६६. रोगप्रतिबंधक औषध ६७. पशुवत ६८. सोंगटी ६९. सैनिक ७२. साळुंकी ७३. मलई ७४. अरण्यात पसरलेली आग ७६. लंकेचा झोपाळू राक्षस ७८. कोल्हापुरी दागिना ८०. जेमतेम ८१. रागीट ८३. फळातील गर ८४. पापी लोक मेल्यावर इथे जातात अशी समजूत आहे ८६. कापडी तंबू ८७. चंगळ ८८. दिव्यांची आरास ९०. साहचर्य ९२. गोव्यातले प्रमुख शहर ९३. भूभाग, स्थान ९४. अथवा ९५. आरमार ९७. यज्ञ, याग ९८. पूल ९९. सोपे १०१. युद्धनौका १०२. देवाला सोडलेला बैल १०३. ताडाच्या झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय १०४. दिवस १०५. तागाची दोरी

**उभे शब्द –**

१. 'कठीण समय येता ×× ××× ××' २. गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक ३. कच्च्या दुधाचा पदार्थ ५. दुबळा ६. चक्कर, बेशुद्धी ७. कोणतेही काम करण्यासाठी अवैध पैसे घेणारा ८. माज, गर्व ९. प्रघात १०. भ्रतार ११. वर्ष १३. स्वार्थ १५. शेवट १६. काही काळाने १७. प्रवास करायला कठीण वाट १८. बाधा, संसर्ग २२. उलट २३. आक्रमकता सोडून पूर्ण शरणागती पत्करणे २५. प्रेम २७. सोने, सुवर्ण २९. घोड्याच्या पावलांना ठोकलेला पत्रा ३०. वेळू, बांबू ३२. अचानक झालेली इच्छा, लहर, सुरसुरी ३६. लहान मुलाला यात निजवण्याचे गाणे ३७. लाट ३८. प्रतिबंध, अडवणे ४१. जप्ती ४२. जीव ४४. लांब अंतरावरील ४६. राख ४८. विनोबांच्या आश्रमाचे स्थान ४९. काखेत कळसा आणि ××× ××× ५१. भारताच्या शोधार्थ निघून चुकून अमेरिकेला पोचलेला स्पेनचा दर्यावर्दी ५२. चेला, शिष्य ५३. दासी ५४. चामखीळ ५६. अखंड ५७. कोंढाणा किल्ला घेताना हुतात्मा झालेला सेनानी – ×××× ××× मालुसरे ६०. युधिष्ठिराचे असत्य वचन ६२. कथानकातील दुष्ट पात्र ६३. अधीन ६७. डोंगराच्या पायाची बाजू ६८. अशुभ सावली ७०. आकाश ७१. झाडाचे पान ७३. नियमितपणा ७५. विष्णूचा बलीराजाला पाताळात धाडणारा अवतार ७७. कणव ७९. लोकसंख्या मोजणे ८२. अब्रू ८५. रमलेला ८६. दया ८७. पहिला मराठी महिना ८९. देव ९१. तर्र ९३. कुशल, सगळे ठीक ९४. संशय ९५. बोट ९६. लहान ९७. अटकळ ९८. मळवट ९९. पुत्र १००. कलिका •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५७६ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. सकस ३. जिवलग मित्र ७. कांदा ९. बल्लव ११. आत्या १२. रसातळ १३. योद्धा १४. मिनीट १५. ग्रहण १८. नाद १९. मानी २०. वराह २१. मोहक २२. उपसागर २५. शीतल २७. पाडा २८. नारद २९. हिम ३०. सदाशिव ३१. समा ३२. दाहक ३४. कप ३६. भूत ३७. उंदीर ३८. सह ४०. दवा ४२. पोट ४४. रखमा ४५. भस्मसात ४६. साचा ४७. बरबाद ४९. मुद्रा ५०. नीर ५१. हमरस्ता ५३. महती ५५. यामिनी ५९. खाडा ६१. रड ६३. याग ६४. वाडवडील ६७. कजाग ६९. शेलका ७२. उरू ७३. ढब ७४. फळभाजी ७६. चोचले ७७. नादार ७९. दात ८०. धुरा ८१. नळी ८२. गजवदन ८५. बाहू ८६. जव ८७. मठ्ठ ८८. ठीक ८९. गज ९०. वसन ९२. दैना ९३. स्वस्त ९४. वजा ९६. मदन ९८. अत्यवस्थ ९९. कडा १०१. थोरही बिघडतो १०४. वर्चस्व १०५. त्रिशूळ १०६. कडे १०७. रस १०८. फलश्रुती १०९. लज्जा ११०. वाकळ

**उभे शब्द** : १. सत्याग्रह २. सरण ३. जितराप ४. वळ ५. गर्व ६. त्रयोदशी ८. दामिनी ९. बटवडा १०. वज्रहनुमान मारुती १६. हकनाक १७. रोग १९. मालदार २१. मोजदाद २२. उदक २३. साचा २४. रहित २६. तसदी २७. पावस ३३. हवाला ३५. पडसाद ३६. भूमी ३७. उंट ३९. हरदम ४१. सुभद्रा ४२. पोचा ४३. शिरस्ता ४६. सारखा ४७. बरड ४८. तया यातना कठीण ४९. मुनी ५२. मरगळ ५४. हल्ला ५६. मिग ५७. धोंड ५८. जोडी ६०. डाक ६२. मोल ६४. वारू ६५. वजा ६६. लढत ६८. जाफराबादी ६९. शेजी ७०. काचोळी ७१. गलेलठ्ठ ७२. उरग ७५. भाऊ ७८. सावज ७९. दानव ८१. नव ८३. जगजाहीर ८४. सनद ८६. जनावर ८७. मस्तकशूळ ९१. समतोल ९२. दैत्य ९४. वर ९५. मेघ ९७. नवती ९८. अस्वल १००. डाळ १०१. थोडे १०२. बिस १०३. डफ १०५. त्रिक

# अजित पवारांच्या घराबाहेर जादुटोणा केला तेव्हा भोंदू अशोक खरात ठाण्यात होता

पान १ वरून

अजित पवार यांचा २८ जानेवारी २०२६ रोजी मृत्यू झाला, त्याच्या एक दिवस आधी म्हणजे २७ जानेवारीपासून ३१ जानेवारी या कालावधीत समता पतसंस्थेत ५ कोटी ३३ लाखांची अफाट उलाढाल झाली,असा दावा करताना दमानिया यांनी या कालावधीत समता पतसंस्थेत झालेल्या बँकिंग व्यवहाराची प्रत माध्यमांना दाखवली.एवढे सर्व काही स्पष्ट दिसत असताना मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने त्याची गंभीर दखल घेऊन सखोल तपास करायला हवा होता.परंतु तसे काहीच होताना दिसले नाही, असे दमानिया म्हणाल्या.

आमदार दीपक केसरकर यांचा विश्वासू साथीदार असलेल्या दीपक लोंढे याचे भोंदू खरातशी जवळचे संबंध होते , त्यांचा खरातशी १८९ वेळा फोन संपर्क झाला. हे जगजाहीर झाले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अद्याप चौकशीचे आदेश दिलेले नाहीत. केसरकर त्यांच्या सरकारमध्ये सहभागी असलेल्या मित्र पक्षाचे नेते आहेत,म्हणून फडणवीस त्यांना पाठीशी घालू पहात आहेत का,असा सवालही दमानिया यांनी केला.

खरात प्रकरणामुळे बदनाम झालेल्या आणि दोन महत्वाच्या पदांवरून गच्छंती झालेल्या रुपाली चाकणकर यांनी काल सोशल मीडियावर पोस्ट करून दिलेल्या स्पष्टीकरणाचाही दमानिया यांनी समाचार घेतला. खरातला सर्वाधिक फोन कॉल करणाऱ्या पहिल्या दहा लोकांमध्ये रुपाली चाकणकर दुसऱ्या क्रमांकावर आहेत. खरातच्या फोन कॉल रेकॉर्डमधून असे दिसून आले की खरात आणि चाकणकर यांच्यात एकूण १७७ फोन कॉल झाले.त्यापैकी ११९ इनकमिंग कॉल (चाकणकर यांनी खरातला केलेले) तर ५८ आऊटगोईंग कॉल (खरातने चाकणकर यांना केलेले) होते. एवढे उठता बसता फोन कॉल या दोघांमध्ये का झाले याची चौकशी अद्याप करण्यात आलेली नाही.याची चौकशी झाली तर चाकणकर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणून खरात यांच्यासोबत नेमके काय चालले होते हे जनतेसमोर येईल,असे दमानिया म्हणाल्या.

विविध राजकीय पक्षांचे नेते आणि सरकारमध्ये बसलेल्या काही अधिकाऱ्यांनी खरातचे प्रस्थ वाढवले आणि त्याला सातत्याने बचाव करण्याचा प्रयत्न केला. खरातची पत्नी कल्पना खरात आणि मुलगा हर्षवर्धन यांना फरार होण्यास यांनीच मदत केली,असा आरोप दमानिया यांनी केला. खरातची भोंदूगिरी ,त्याने शेकडो महिलांचे केलेले लैंगिक शोषण , बेकायदेशीरपणे केलेले जमिनी खरेदीचे व्यवहार आणि जमवलेली अब्जावधींची माया हे सारे उघड झाल्यानंतर पोलिसांनी खरातच्या कुटुंबियांवर पाळत ठेवणे आवश्यक होते.मात्र पोलिसांनी पाळत ठेवली नाही.त्यांना पळून जाण्यास मदत केली.यामागे भाजपाशी संबंधित नेते आणि अधिकाऱ्यांचा हात आहे,हे स्पष्ट आहे,असे दमानिया म्हणाल्या.

दमानिया यांनी आज म्हटले की खरात यांना फोन करणाऱ्यांमध्ये तृप्ती, रूपाली चाकणकर, दीपक लोंढे, पत्नी कल्पना, बोराडे, नंदकिशोर काटोरे , सचिन चोंबाळे हे अग्रक्रमी आहेत . याशिवाय दादा भुसे यांचे पीए, विखे पाटील यांचे विशेष अधिकारी राहुल कोतडे, राष्ट्रवादीचे जयंत पाटील, राहुल देशमुख, सिन्नर एमआयडीसीचे अधिकारी अविनाश पोटे, महिंद्र शेळके पाटील, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, पोलीस, आरटीओ हे सर्व खरातच्या संपर्कात होते असे आज दमानिया म्हणाल्या.

# आजपासून संसदेचे विशेष अधिवेशन सुरू

पान १ वरून

ठरणार आहे. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर लोकसभेच्या जागा ८५० पर्यंत वाढल्या तर उत्तर प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्राच्या जागांच्या संख्येत सर्वाधिक वाढ होण्याचा अंदाज आहे. प्रत्येक राज्याच्या जागांमध्ये सुमारे ५० टक्के वाढ अपेक्षित आहे. उत्तर प्रदेशच्या जागा ८०वरून अंदाजे १२० पर्यंत, बिहारच्या ४० वरून ६० पर्यंत आणि महाराष्ट्राच्या ४८ वरून ७२ पर्यंत, तमिळनाडूच्या जागा ३९ वरून ५८-५९ पर्यंत आणि कर्नाटकच्या जागा २८ वरून ४२ पर्यंत वाढू शकतात. ८५० जागांपैकी ८१५ जागा राज्यांसाठी आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी प्रस्तावित आहेत. महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणानुसार अंदाजे २८३ जागा राखीव असतील. नवीन मतदारसंघ पुनर्रचना २०११ च्या जनगणनेच्या आधारावर किंवा अशा आराखड्यावर केली जाण्याची शक्यता आहे.

# आदित्य ठाकरेंकडे 'उबाठा'ची कार्याध्यक्षपदाची जबाबदारी?

पान १ वरून

निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावत आहेत.

या चर्चेवर प्रतिक्रिया देताना उबाठाचे खासदार संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे सुद्धा कालांतराने पक्षाचे कार्याध्यक्ष झाले होते. जर आदित्य ठाकरे यांचे नाव आपल्या माध्यमातून समोर आले असेल त्याचे स्वागत केले पाहिजे. नक्कीच आता, तरुण पिढीच्या हाती नेतृत्व देताना या सगळ्या गोष्टींचा विचार केला पाहिजे.

दरम्यान, मुंबईतील सेस/पागडी इमारतीमध्ये राहणाऱ्या भाडेकरूंची योग्य प्रकारे नोंद करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात यावे, अशी मागणी करणारे पत्र आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. आदित्य ठाकरे यांनी यात म्हटले आहे की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात २०२०-२०२१ मध्ये मुंबईतील उपकरप्राप्त (सेस) आणि पागडी इमारतींच्या पुनर्विकासाला चालना देण्यासाठी कलम ७९ (अ) आणि ७९ (ब) बाबत कायद्यात तरतूद करण्यात आली होती. या कायद्याला राष्ट्रपतींचीही मंजुरी मिळाली होती. तथापि, काही जागामालकांकडून याविरोधात कायदेशीर अडथळे निर्माण करण्यात येत आहे. मुंबईत सुमारे १३,५०० हून अधिक उपकरप्राप्त इमारती असून त्यामध्ये लाखो भाडेकरू वास्तव्यास आहेत. यापैकी अनेक इमारती अतिधोकादायक अवस्थेत आहे. न्यायप्रक्रिया सुरू असतानाही काही ठिकाणी भाडेकरूंना घरे खाली करण्याच्या नोटिसा दिल्या जात आहेत. या कारवाईवर स्थगिती द्यावी तसेच अतिधोकादायक इमारतींतील भाडेकरूंची योग्य नोंद करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करावे. या विषयाकडे आपण वैयक्तिक लक्ष देऊन भाडेकरूंना न्याय मिळेल असा मार्ग काढावा जेणेकरून पुनर्विकास प्रक्रियेस चालना मिळेल.

मात्र आ. आदित्य ठाकरे यांनी या चर्चा फेटाळल्या. ते म्हणाले की, मला पक्षात काही पद दिले जाणार आहे, ह्या बातमीत काहीही तथ्य नाही. अशी कुठलीही चर्चा पक्षात नाही. कृपया ह्याची नोंद घ्यावी.

## जाहिर नोटीस

**मे. राजा देशी बार** सीएल-३ क्र. ४६, ही अनुज्ञप्ती शॉप नं.६६ पॉकिटवाला चाळ कंपाऊंड, हरीयनवाला चाळ, स्टेशन रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०००७० या ठिकाणी कार्यरत असुन सदरची अनुज्ञप्ती **श्री शंकर राजारामन** यांच्या नावे कार्यरत आहे, मात्र अनुज्ञप्तीचे अनुज्ञप्तीधारक श्री शंकर राजारामन यांना अनुज्ञप्तीचे व्यवहारात लक्ष देता येत नाही. सदर अनुज्ञप्तीचे व्यवहार सुरळीत सुरु राहण्याकरीता सदर अनुज्ञप्तीमधुन अनुज्ञप्तीधारक श्री शंकर राजारामन यांचे नांव कमी करुन सदर अनुज्ञप्ती श्रीमती आरती राजेंद्र पालवे, रा.रुम नं.१, तळ मजला, उरणवाला रस्ता, अप्सरा सिनेमा हॉल जवळ, ग्रँट रोड, मुंबई-४००००७ यांचे नांवे हस्तांतरीत करण्याची विनंती केलेली आहे. तरी याबाबत कोणास काही हरकत असल्यास त्यांनी त्यांचे लेखी आक्षेप ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ८ दिवसाच्या आत " अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर-२, राज्य उत्पादन शुल्क भवन, दुसरा मजला, प्लॉट नं.१४५०, महानगरपालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ " या पत्त्यावर पाठवावी. जर वरील मुदतीत कोणताही लेखी आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अनुज्ञप्ती श्रीमती आरती राजेंद्र पालवे, रा. रुम नं. १, तळ मजला, उरणवाला रस्ता, अप्सरा सिनेमा हॉल जवळ, ग्रँट रोड, मुंबई-४००००७ यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात येईल.

**Digitally signed by**
**Date: 18-03-2026 15:52:34**

**फॉर्म क्र. INC-25A**

**सार्वजनिक कंपनीचे खासगी कंपनीत रूपांतर करण्याबाबत वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी जाहिरात**
**प्रादेशिक संचालक, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय यांच्यासमोर**
**मुंबई विभाग – I**
**कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 14 अन्वये आणि कंपनी (स्थापना) नियम, 2014 च्या नियम 41 अन्वये बाब**
**आणि**

**M/s. दसाल्ट रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड** (CIN: U35999MH2017PLC291083), ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय 502, 91-94 प्रभात कॉलनी, सांताक्रूझ पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत – 400055 येथे आहे, अर्जदार सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, वरील कंपनी कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 14 तसेच वरील नमूद नियमांनुसार केंद्र सरकारकडे अर्ज करण्याचा विचार करीत आहे आणि दिनांक 31 मार्च 2026 रोजी झालेल्या असाधारण सर्वसाधारण सभेत मंजूर केलेल्या विशेष ठरावानुसार कंपनीचे खासगी मर्यादित कंपनीत रूपांतर करण्याची इच्छा व्यक्त केली आहे, जेणेकरून सदर रूपांतरणाची अंमलबजावणी करता येईल.

प्रस्तावित बदल/कंपनीच्या स्थितीमुळे ज्यांच्या हितसंबंधांवर परिणाम होऊ शकतो, अशा कोणत्याही व्यक्तीने आपल्या हरकती शपथपत्रासह (ॲफिडेविट) सादर कराव्यात. त्यामध्ये त्यांच्या हितसंबंधाचे स्वरूप व हरकतीची कारणे नमूद करावीत आणि सदर हरकती संबंधित प्रादेशिक संचालक, Everest, 5 वा मजला, 100 मरीन ड्राइव्ह, मुंबई – 400002, महाराष्ट्र येथे या जाहिरातीच्या प्रकाशनाच्या तारखेपासून चौदा दिवसांच्या आत प्रत्यक्ष सादर कराव्यात किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवाव्यात. तसेच त्याची एक प्रत अर्जदार कंपनीच्या खालील नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी.

अर्जदाराच्या वतीने आणि त्यांच्यासाठी
दसाल्ट रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड
मिस्टर निकोलस ख्रिश्चन फर्नांड मेरी हॉटबॉइस
संचालक
DIN: 08400934
**नोंदणीकृत कार्यालय: 502, 91-94 प्रभात कॉलनी, सांताक्रूझ पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत – 400055**
दिनांक: 16 एप्रिल 2026
ठिकाण: मुंबई

## TENDER NOTICE

Sealed tenders are invited from reputed contractors who had not participated earlier in the tender floated on 1st of Feb 2026. This tender call is for new participants, for Repairs, Painting & Other Allied works of

**OBEROI SPRINGS CHSL**

Veera Desai Road, Andheri West, Mumbai 400053

Tender Cost Rs. 40,000 + GST Online (Non-Refundable) **Tender Mode:** Online collection & online submission only EMD will be 1% by DD in favour of Society

**Tender Availability: 16/04/2026 till 22/04/2026**
**Submission online by 25/04/2026 by 5:00pm**

Link: https://crm.airrises.com/t/7

**माननीय एनसीएलटी, मुंबई यांच्या निर्देशानुसार**
**प्रतिवादींना सुनावणीची सूचना**

**विषय: राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई (न्यायालय क्र. ४) समक्ष**
**कंपनी याचिका क्र. (आयबी) ३७१ (एमबी) २०२५**

**बँक ऑफ महाराष्ट्र** (वित्तीय धनको) विरूध्द **एसपीडी कोल्ड स्टोरेज एलएलपी** (कॉर्पोरेट ऋणको)

**आयए क्र.८७५/२०२६**

प्रशांत जैन, एसपीडी कोल्ड स्टोरेज एलएलपी चे ठराव व्यावसायिक ... अर्जदार

विरूध्द

**१. दर्शित अशोक शाह आणि राजेंद्र पोपटलाल शाह;**
**पत्ता :** नवीन पीएल क्र.३०५, गेट क्र.२, ई-वॉर्ड, गाडी अड्डा, साहू मार्केट यार्ड, कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६५००५
कार्यालयाचा पत्ता: पुणे ऑफिस ५९०, गणेश पेठ, ढोर गल्ली, पुणे, महाराष्ट्र - ४११००२ .... प्रतिवादी

**विषय: सुनावणीची सूचना**

वरील नमूद प्रतिवादींना याद्वारे कळविण्यात येते की, संदर्भित अंतरिम अर्ज क्र.८७५/२०२६ हा रिझोल्यूशन प्रोफेशनल श्री. प्रशांत जैन यांनी प्रतिवादींविरुद्ध दाखल केला असून, तो संबंधित कंपनी याचिका (सीपी (आयबी) ३७१ (एमबी) २०२५) मध्ये, नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या तरतुदीनुसार दाखल करण्यात आलेला आहे. सदर अंतरिम अर्जाची सुनावणी मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई (न्यायालय ४) समोर दिनांक १५ मे, २०२६ रोजी स.१०:३० वा. किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर ठेवण्यात आलेली आहे, ज्यामध्ये वरील नमूद प्रतिवादींनी इच्छित असल्यास उपस्थित राहावे.

सही/-
**प्रशांत जैन,** रिझोल्यूशन प्रोफेशनल
एसपीडी कोल्ड स्टोरेज एलएलपी

# अबू सालेमची मागणी कोर्टाने फेटाळली

पान १ वरून

युक्तिवाद केला होता की, भारत आणि पोर्तुगालमधील प्रत्यार्पण करारानुसार तो २५ वर्षांचा कारावास पूर्ण केल्यास सुटकेस पात्र ठरतो. त्याच्या वकील फरहाना शहा यांनी न्यायालयाला त्याच्या सुटकेची संभाव्य तारीख निश्चित करण्याचे निर्देश देण्याची विनंती केली होती.

जुलै २०२२ मध्ये सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले होते की, २५ वर्षांचा कारावास पूर्ण झाल्यानंतरच केंद्र सरकार राष्ट्रपतींना शिक्षा माफीबाबत सल्ला देऊ शकते. त्या कालावधीपूर्वी शिक्षा कमी किंवा बदलता येणार नाही. केंद्र सरकारतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंग यांनी या याचिकेला विरोध करत ती निराधार असल्याचा युक्तिवाद केला. गृह मंत्रालयाच्या वतीने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात सालेमने वेगवेगळ्या शिक्षा कालावधी एकत्र करून चुकीचा दावा केल्याचे नमूद करण्यात आले. सरकारच्या म्हणण्यानुसार, अबूच्या २५ वर्षांच्या शिक्षेचा कालावधी १० नोव्हेंबर २०३० रोजी पूर्ण होईल. त्यानंतरच रिमिशनचा विचार केला जाऊ शकतो.

# सुनेत्रा काकींच्या प्रचारासाठी पुतण्या रोहित पवार मैदानात

पान १ वरून

त्या काळात निर्णय घेणारे तेच होते. आज पवारसाहेबांमुळे हा परिवार एकत्र आहे. पण आता आपला नेता पुन्हा दिसणार नाही, ही जाणीव वेदनादायक आहे. मी वेगळ्या पक्षात असलो तरी अजितदादा माझे काका होते आणि मी त्यांचा चाहता होतो. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न झाले. मोठ्या पक्षांनी उमेदवार दिला नाही. मात्र अपक्ष उमेदवारांनी उभे आहेत. आपल्या गावातून एकही मत अपक्ष उमेदवारांना जाऊ नये. ९९ टक्के मतदान सुनेत्रा पवारांना मिळेल, यासाठी प्रयत्न करा. बाहेरून आलेल्या उमेदवारांना एकही मत मिळू नये.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, (अ) सौ. हीना रतनशी व्होरा उर्फ हीना राहुल शाह आणि (ब) सौ. प्रमिला रतनशी व्होरा हे भुलाभाई देसाई रोड, मुंबई-४०००२६ येथील मलबार हिल विभागाच्या कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ४/७५५ येथील तिरुपती अपार्टमेन्ट या इमारतीच्या तळघरामधील भांडार क्र. ३ चे मालक आहेत आणि त्यांच्याकडे सदर दुकान आणि तळघराचा ताबा आहे.

आम्ही दुकान आणि तळघराच्या संदर्भात उपरोल्लेखित मालकांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत. कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था समाविष्ट असलेल्या कोणीही आणि सर्व व्यक्ती/संस्था यांचा विक्री, देवाणघेवाण, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, अभिहस्तांकन, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, देखभाल, वहिवाट, न्यास, भाडेकरू, पोट-भाडेकरू, परवाना, भोगवटा, ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम आणि/किंवा आदेश, कंत्राट, करारपत्र, विकास अधिकार, भागिदारी, कोणतीही व्यवस्था या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, दावा आणि/किंवा मागणी इ. असल्यास, त्यांनी याद्वारे त्याबाबत सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना खाली नमूद केलेल्या पत्ता आणि ईमेल आयडीवर सदर प्रसिद्धीपासून १० (दहा) दिवसांमध्ये सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास, कोणतेही आणि सर्व हक्क, शीर्षक, हितसंबंध, लाभ, दावे आणि/किंवा अभिहस्तांतरण आणि अभिहस्तांकन अशा कोणत्याही दावे इ.च्या संदर्भाशिवाय आमच्या अशिलाच्या नावे पूर्ण करण्यात येईल.

**वरील संदर्भित अनुसूची:**

| अ. क्र. | सदस्याचे नाव | मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|
| १ | (अ) सौ. हीना रतनशी व्होरा उर्फ हीना राहुल शाह आणि (ब) सौ. प्रमिला रतनशी व्होरा | मलबार आणि कंबाला हिल विभागाचा सी.टी.एस. क्र. ४/७५५ धारण केलेल्या जमिनीच्या भूखंडावर बांधलेला, भुलाभाई देसाई रोड, महालक्ष्मी मंदिरासमोर, मुंबई ४०००२६ येथे स्थित 'तिरुपती अपार्टमेन्ट्स' या इमारतीमधील तळघरामधील भांडार क्र. ३, मोजमाप ६०० चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ प्रत्येकी |

दिनांक १६ एप्रिल, २०२६

सही/-
ॲडव्होकेट
**इंडिया लॉ अलायन्स**
१ला मजला, जीवन प्रकाश बिल्डींग, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई ४००००१.
ईमेलः kavisha.shah@indialawalliance.com

## जाहीर सूचना

याद्वारे कळविण्यात येते की, त्रिवेणी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. (त्रिवेणी कोहौसोलि), ओम नगर, सहार पाइपलाईन रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९९ यांनी जारी केलेले मूळ भाग प्रमाणपत्र क्र.२७, ज्यामध्ये शेअर्स क्र.१३१ ते १३५ समाविष्ट आहेत, हे श्री. नारायण करसन पटेल यांच्या नावावर, फ्लॅट क्र.सी-२०९ संदर्भात असून, हरवले/गहाळ झाले आहे. सदर भाग प्रमाणपत्र प्रामाणिक व सखोल शोध घेऊनही सापडलेले नाही आणि त्याच्या हरवण्याबाबत स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. तसेच, धारकाने यासंदर्भात नुकसानभरपाई बंधपत्र व प्रतिज्ञापत्र देखील सादर केले आहे.

सदर भाग प्रमाणपत्राबाबत कोणत्याही व्यक्तीस काही दावा, हरकत किंवा हक्क असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात आपला दावा खाली सही करणाऱ्याकडे किंवा त्रिवेणी कोहौसोलिच्या नोंदणीकृत पत्त्यावर सादर करावा. अन्यथा, कोणत्याही पुढील संदर्भाविना सोसायटीकडून दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

दिनांक: १६ एप्रिल २०२६
ठिकाण: मुंबई

**नारायण करसन पटेल**
फ्लॅट क्र.सी-२०९, त्रिवेणी कोहौसोलि
९८१९२०२७३६

## MILESTONE CAPITAL ADVISORS PRIVATE LIMITED
**(CIN: U67190MH2005PLC153819)**

**Registered office address :** PS 56, CoWrks Worli, 3rd Floor, Birla Centurion, Pandurang Budhkar Marg, Worli, Mumbai - 400 030. | **Tel :** 022 6288 6120
**Email :** compliance@milestonecapital.in | **Web :** www.milestonecapital.in

**NOTICE CUM INTIMATION FOR SURRENDER OF SEBI REGISTRATION CERTIFICATE AS A PORTFOLIO MANAGER OF MILESTONE CAPITAL ADVISORS PRIVATE LIMITED**

Notice is hereby given to all clients, stakeholders and the general public that Milestone Capital Advisors Private Limited, a private limited company registered under [the Companies Act, 2013] ("Milestone") and registered with the Securities and Exchange Board of India ("SEBI") as a Portfolio Manager under the SEBI (Portfolio Managers) Regulations, 2020 ("PMS Regulations"), bearing SEBI Registration No. INP000002643, is surrendering its certificate of registration as a Portfolio Manager.

Surrender of Registration:

Milestone has decided to discontinue its portfolio management activities and accordingly is surrendering its SEBI registration certificate as a portfolio manager, subject to receipt of necessary approvals from SEBI and completion of all regulatory requirements under the PMS Regulations and other applicable laws.

**General :**

This notice is issued for the purpose of public intimation in compliance with applicable regulatory requirements.

In case you need any further clarifications, please contact us on the details provided below:

**Name :** Mihir Parikh
**Address :** PS56, CoWrks Worli, 3rd Floor, Birla Centurion, Pandurang Budhkar Marg, Worli, Mumbai - 400 030. | **Telephone No.:** 022 6288 6120
**E-mail ID:** compliance@milestonecapital.in

For Milestone Capital Advisors Private Limited
(Registered Portfolio Manager)
(Authorised Signatory)

Place : Mumbai
Date : 16th April, 2026

**THIS NOTICE IS ISSUED FOR PUBLIC INFORMATION IN RELATION TO THE SURRENDER OF SEBI REGISTRATION AS A PORTFOLIO MANAGER BY MILESTONE CAPITAL ADVISORS PRIVATE LIMITED.**

नवाकाळ

• पुणे । गुरुवार १६ एप्रिल, २०२६ • पान -८


# आयकर कर्मचाऱ्यांचा आजपासून देशव्यापी आंदोलनाचा इशारा




**नवी दिल्ली -** आयकर विभागातील दोन प्रमुख कर्मचारी संघटनांनी सरकारला पत्र लिहून इशारा दिला आहे की, त्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित मागण्या आणि अस्थिर कामकाजाच्या परिस्थितीवर उपाय न झाल्यास ते उद्यापासून टप्प्याटप्प्याने आंदोलन सुरू करतील. जॉईंट कौन्सिल अॅक्शन या संघटनेत इन्कम टॅक्स एम्प्लॉईज फेडरेशन आणि इन्कम टॅक्स गॅझेटेड ऑफिसर्स असोसिएशन यांचा समावेश आहे. या संघटना मिळून विभागातील सुमारे ९७% कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करतात, जे सरकारसाठी थेट करांद्वारे महसूल संकलनाचे काम करतात. इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिसमधील अधिकारी ही तिसरी संघटना असून, ते विभागातील विविध शाखांचे प्रमुख म्हणून काम पाहतात.

# तरुणांना 'पुतळा' बनवणारे 'झोम्बी ड्रग' नेमके काय?

**झोम्बी नाव ऐकले की डोळ्यासमोर लगेच एक भयानक आकृती उभी राहते ती म्हणजे जिवंत असूनही निर्जीव, हालचाल कमी, चेहऱ्यावर कोणतीही भावना नाही आणि एका जागी स्तब्ध उभा असलेला माणूस. सायन्स फिक्शन चित्रपटांमध्ये पाहिलेल्या त्या 'जिवंत मृतदेहां' सारखीच ही प्रतिमा असते. पण धक्कादायक बाब म्हणजे, आता ही कल्पना केवळ चित्रपटांपुरती मर्यादित राहिलेली नाही. वास्तवातही काही तरुण अगदी अशाच अवस्थेत दिसू लागले आहेत आणि यामागे कारण म्हणून समोर येत आहे कथित 'झोम्बी ड्रग'.**



■ मुंबई

**काही** दिवसांपासून सोशल मीडियावर काही व्हिडिओ व्हायरल होत आहेत या व्हिडिओंमध्ये काही तरुण एका जागी पूर्णपणे स्तब्ध उभे असल्याचे दिसत आहेत. ते ना हालचाल, ना प्रतिक्रिया. जणू ते जिवंत असूनही 'पुतळ्यासारखे' झाले आहेत. या विचित्र अवस्थेमागे 'झोम्बी ड्रग' असल्याचा दावा सोशल मीडियावर केला जात आहे. चीनमधून जसा कोरोना जगभर



पसरला आणि जगात मृत्यूचे तांडव झाले अगदी तसेच अमेरिकेने गाई आणि घोड्यांना भूल देण्यासाठी तयार केलेल्या झायलझीन नावाच्या ड्रगने जगाचे टेन्शन वाढवले आहे. आधी लॅटिन अमेरिकेत हैदोस घालणाऱ्या आणि तरुणाईला झिंगवणाऱ्या या ड्रगचा आता भारतातही शिरकाव झाला आहे आणि तरुणाई जीवघेण्या झोम्बी ड्रगच्या विळख्यात सापडली आहेत. चंदीगडमध्ये डिलिव्हरी बॉय, बिहारमध्ये मोटारसायकलवरचा तरुण आणि त्यानंतर बंगळूरुमध्ये एक तरुण 'झोम्बी'सारखा उभा होता. आता मिरा-भाईंदरमध्येही अशा प्रकारच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. युवकांमध्ये या ड्रगचा प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता, ही बाब अत्यंत धोकादायक मानली जात आहे. इतके घातक झोम्बी ड्रग नेमके आहे तरी काय? ते भारतात कसे आले असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

**शरीरावर कसा होतो परिणाम?**

झायलाझिन मेंदूतील आणि मज्जासंस्थेतील 'अल्फा-२ रिसेप्टर्स' सक्रिय करते. त्यामुळे 'नॉरपेनेफ्रिन' या महत्त्वाच्या न्यूरोट्रांसमीटरचे प्रमाण कमी होते. हा घटक आपल्या शरीराला जागे, सतर्क आणि सक्रिय ठेवण्यास मदत करतो. त्याचे प्रमाण घटल्याने शरीरावर गंभीर परिणाम होतात.

मेंदूची क्रिया मंदावते: व्यक्ती पूर्णपणे गुंगीत जाते. आसपास काय चालले आहे याचे भान राहत नाही. स्नायू शिथिल होतात. हालचाल करण्याची क्षमता कमी होते. शरीरात शक्ती राहत नाही. काही वेळा व्यक्ती तासन्‌तास पुतळ्यासारखी एकाच स्थितीत उभी किंवा बसून राहते. यामुळेच या ड्रगला 'झोम्बी' नाव दिले आहे. जे कोणी या ड्रगच्या अंमलाखाली येते तो व्यक्ती पुतळ्यासारखा एका जागी स्तब्ध होतो. तो काही प्रमाणात बेशुद्ध अवस्थेत पोहोचतो. काही गंभीर केसेसमध्ये पीडिताच्या शरीरावर जखमा आणि लाल चट्टे निर्माण होतात. एवढेच नाही तर या ड्रगच्या ओव्हरडोसमुळे तरुणांचा मृत्यूही होण्याची शक्यता असते.

### झोम्बी ड्रग म्हणजे नेमके काय?

'झोम्बी ड्रग' हा कोणताही अधिकृत वैज्ञानिक शब्द नाही. मात्र, सामान्यत: तो झायलाझिन या औषधाशी संबंधित मानला जातो. झायलाझिन हे मूळत: प्राण्यांसाठी वापरले जाणारे एक भूलीचे औषध आहे. हे औषध माणसांसाठी नसून याचा वापर जनावरांना शांत करण्यासाठी किंवा उपचारांच्या वेळी वेदना कमी करण्यासाठी केला जातो. झायलाझिन हे नॉन-ओपिओइड ड्रग आहे, म्हणजेच ते अफीमपासून तयार केलेले नाही. मात्र, जेव्हा हे औषध फेंटानिल, हेरॉईन किंवा कोकेन यांसारख्या अमली पदार्थांसोबत मिसळले जाते, तेव्हा त्याचा परिणाम अत्यंत घातक होतो. या मिश्रणालाच 'झोम्बी ड्रग' म्हटले जाते.

# वेदांता प्लांट स्फोटात मृतांचा आकडा १४ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ रायपूर

**छत्तीसगडमधील** शक्ती जिल्ह्यातील वेदांता पॉवर प्लांटमध्ये झालेल्या भीषण बॉयलर स्फोटातील मृतांचा आकडा १४ वर पोहोचला आहे. या दुर्घटनेनंतर वेदांता कंपनीसह राज्य सरकार आणि पंतप्रधानांकडून आर्थिक मदत जाहीर केली आहे.

वेदांता पॉवर प्लांटमधील 'सुपरहीटेड' विभागात झालेल्या स्फोटामुळे एकूण ३३ कामगार जखमी झाले होते. त्यापैकी १४ जणांचा मृत्यू झाला असून, उर्वरित १९ जखमींवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेनंतर वेदांता कंपनीने मृतांच्या कुटुंबियांना ३५ लाख रुपये, तर जखमी कामगारांना १५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च कंपनी उचलणार असून, मृतांच्या कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्याचे आश्वासनही कंपनीने दिले आहे. तर छत्तीसगड सरकारकडूनही मदत जाहीर करण्यात आली असून, मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपये देण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

# 'कोस्टल'वर समुद्राच्या लाटा! दोन फ्लड गेटचे नुकसान

**इंदूरच्या चाचणीनंतर नवीन दोन फ्लड गेट लावणार**

■ मुंबई

**पावसाळी** पाण्याचा निचरा करण्यासाठी कोस्टल रोडवर विविध ठिकाणी १५ फ्लड गेट बसवण्यात आले आहेत. मात्र समुद्राच्या लाटांमुळे यातील दोन फ्लड गेटचे मोठे नुकसान झाले आहे. काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळेच या दोन फ्लड गेटचे नुकसान झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्यामुळे आता इंदूर येथे चाचणी यशस्वी झाल्यावरच या ठिकाणी नवीन दोन फ्लड गेट बसविले जाणार आहेत.

दोन वर्षांपूर्वी मार्च २०२४ मध्ये कोस्टल रोड मुंबईकरांच्या सेवेत दाखल झाला आणि वांद्रे सी-लिंक ते प्रियदर्शनी पार्कपर्यंतचा प्रवास सुकर झाला आहे. पावसाळ्यात या कोस्टल रोडवर पाणी साचू नये, यासाठी ठिकठिकाणी पाण्याचा उपसा करणारे पंप बसविले आहेत. तर १५ ठिकाणी फ्लड गेट बसवले आहेत. परंतु यातील दोन फ्लड गेटचे नुकसान झाले आहे. या दोन फ्लड गेटची दिशा योग्य आहे. मात्र फ्लड गेटचा आराखडाच चुकला असून, हे गेट निकृष्ट दर्जाचे असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पावसाळ्याआधी हे गेट नव्याने बसवण्याचा निर्णय घेतल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# अकोल्यात उष्माघाताचा पहिला बळी रिक्षाचालकाचा मृत्यू! पारा ४४ अंशांवर

■ अकोला

**'एल्डोराडो'** या जागतिक हवामान संकेतस्थळाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, काल महाराष्ट्रातील अकोला आणि कर्नाटकातील कलबुर्गी या दोन शहरांनी जगातील सर्वात उष्ण शहरे म्हणून नोंदली गेली असून, या दोन्ही शहरांत ४४ अंश सेल्सिअस इतक्या विक्रमी तापमानाची नोंद झाली आहे. अकोला शहरात सलग तिसऱ्या दिवशी देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली असून, उष्माघातामुळे एका रिक्षा चालकाचा मृत्यू झाला.

कर्नाटक व लगतच्या महाराष्ट्रात उच्च दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. यामुळे हवा खाली दाबली जात असल्याने ती गरम होत आहे. यामुळे जमिनी लगतची उष्णता वातावरणात वर जाऊ शकत नसल्याने तापमान वाढत आहे. आभाळ निरभ्र असल्यामुळे सूर्याची किरणे थेट जमिनीवर पडून तापमान वाढत आहे, असे हवामान तज्ज्ञांनी सांगितले. अकोल्याचे तापमान पुढील ४८ तासांत ४५ अंशांचा टप्पा ओलांडण्याचा अंदाज आहे.

# मध्य रेल्वे लोकलमध्ये मराठी नाहीच सूचना फक्त हिंदी आणि इंग्रजी भाषेत

■ मुंबई

**मध्य रेल्वेच्या** ताफ्यात नुकतीच स्वयंचलित दरवाजांची नॉन-एसी लोकल दाखल झाली आहे. तिच्या चाचण्या चालू असतानाच लोकलमधील सूचनांवरून नवा वाद निर्माण झाला आहे. या सूचना केवळ हिंदी आणि इंग्रजी भाषेत असल्याने मराठी भाषेला डावलल्याचा आरोप केला जात आहे.

ही नवी लोकल चेन्नईतील आयसीएफ (इंटिग्रल कोच फॅक्टरी) येथे तयार करण्यात आली असून, ती कुर्ला कारशेडमध्ये आणण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या




धोरणानुसार रेल्वेमध्ये मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांचा वापर अपेक्षित आहे. नव्या लोकलच्या अंतर्गत भागात विविध सूचना केवळ हिंदी आणि इंग्रजीतच लिहिल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे मराठी भाषेचा वापर केवळ डब्यांच्या ओळखीपुरता दरवाजाबाहेरील भागात करण्यात आला आहे. त्यातही अनेक चुका आढळल्या आहेत. सकाळीऐवजी सकाली, तसेच २४ तास फक्त स्त्रियांसाठी ऐवजी चौबीस तास फकतक्त स्त्रियांसाठी असे लिहिण्यात आले आहे. यापूर्वीही मध्य रेल्वेवर मराठीला डावलल्याचे आरोप अनेकदा झाले आहेत.

# मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्सवरील संगीत कार्यक्रमांना मनसेचा विरोध

■ मुंबई

**गोरेगाव** येथील नेस्को पार्कमधील संगीत कार्यक्रमात (म्युझिक कॉन्सर्ट) ड्रग सेवनाने दोन तरुणांचा मृत्यू झाल्यावर आता मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या संगीत कार्यक्रमावरून वाद निर्माण झाला आहे. मनसेने या कॉन्सर्टला परवानगी देऊ नये, अशी मागणी केली आहे.

महालक्ष्मी रेसकोर्सवर महिन्यातून एक ते दोन वेळा आयोजित होणाऱ्या म्युझिक कॉन्सर्टमध्ये तरुणांना मद्य तसेच अंमली पदार्थ सहज उपलब्ध करून दिले जातात, असा आरोप करत मनसेने याबाबत तातडीने कारवाईची मागणी केली आहे. या संदर्भात ताडदेव पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पत्र देत अशा कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशी मागणी मनसेने केली आहे.

मलबार हिल विभागाचे मनसे अध्यक्ष दिनेश पुंडे म्हणाले की, महालक्ष्मी रेसकोर्स येथे वारंवार म्युझिकल कॉन्सर्ट आयोजित केले जातात. यापूर्वीही आम्ही पोलिसांना दोन वेळा पत्र देऊन या कार्यक्रमात अल्पवयीन मुले मद्यपान आणि ड्रग सेवन करत असल्याची माहिती दिली होती. आमच्याकडे यासंदर्भातील काही व्हिडिओ पुरावेही आहेत. ते आम्ही पोलिसांना दाखवले आहेत.

# दक्षिण मुंबईत आज-उद्या १८ तास पाणीपुरवठा बंद

■ मुंबई

**पाणीपुरवठा** व्यवस्थेतील देखभाल कामांमुळे दक्षिण मुंबईतील अनेक भागांमध्ये १६ आणि १७ एप्रिल रोजी १८ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच काही भागांत कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

मुंबई महानगरपालिका कडून शिवडी येथील टनल भंडारवाडा टेकडी जलाशय वाहिनीवर हाजीबंदर मार्गावर १५०० मिमी व्यासाचा बटरफ्लाय व्हॉल्व बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे भंडारवाडा, फॉसबेरी आणि गोलंजी टेकडी जलाशयांचा पाणीपुरवठा सुव्यवस्थित करण्याचा उद्देश आहे. ही देखभाल प्रक्रिया उद्या गुरुवार, १६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ४ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

# खरात-चाकणकरांच्या घरांवर बुलडोजर कधी चालवणार?

**सुषमा अंधारे यांचा सवाल**

■ मुंबई

**भोंदू खरात** प्रकरणावरून आज उबाठाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना लक्ष्य केले. अमरावतीच्या परतवाडा लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीच्या घरावर जसा बुलडोजर चालवला तसा खरात आणि रुपाली चाकणकर यांच्या घरांवर कधी चालवणार, असा सवाल अंधारे यांनी आज पत्रकार परिषदेत केला.


खरात प्रकरणात पहिल्या दिवसापासून आम्ही या संदर्भातील अनेक कंगोरे जनतेसमोर आणत आहोत. परंतु आता एक महिना होत आला. या प्रकरणी पोलिसांपेक्षा जास्त काम तर आमच्यासारख्या कार्यकर्त्यांनी आणि माध्यमांनी केले आहे. पोलीस तपासाला अजूनही गती आलेली दिसत नाही. त्यामुळे महिलांच्या प्रश्नांवर मुख्यमंत्री गंभीर नाहीत, असे वाटू लागले आहे. कारण त्यांनी जर गांभीर्य दाखवले असते तर पुढे लैंगिक शोषणाचे आणखी दोन-तीन प्रकार घडले ते घडले नसते.

मुख्यमंत्र्यांनी खरात प्रकरणी गांभीर्य दाखवले नाही याचा अर्थ गुन्हेगारांना त्यांनी महिलांवर अत्याचार करण्यास सूट दिली असा होतो. अमरावतीच्या परतवाडा येथे महिलांच्या लैंगिक शोषणाचे प्रकरण समोर येताच तत्परतेने आरोपीच्या घरावर बुलडोजर चालवणारे सरकार असंख्य महिलांचे लैंगिक शोषण करणारा भोंदू खरात आणि त्याच्याशी आर्थिक संबंध असलेल्या रुपाली चाकणकर यांच्या घरांवर बुलडोजर कधी चालवणार याचे उत्तर देईल का, असा सवाल अंधारे यांनी केला.

# बीकेसीत मेट्रो कामादरम्यान ४०० टनाची क्रेन अचानक उलटली

■ मुंबई

**वांद्रे-कुर्ला** संकुल (बीकेसी) परिसरात मेट्रो लाईन- २ बीच्या कामाच्या



ठिकाणी आज पहाटे अपघात झाला. प्री-कास्ट बीम उचलताना सुमारे ४०० टन वजनाची मोबाईल क्रेन अचानक उलटून गर्डर खाली कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए)ने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना आज पहाटे चार ते साडेचारच्या सुमारास एशियन हार्ट हॉस्पिटल जंक्शनजवळ घडली. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड या कंत्राटदारामार्फत रात्रीचे काम सुरू असताना हा अपघात झाला. एका क्रेनच्या गिअरमध्ये बिघाड झाल्याने उचललेला भार दुसऱ्या क्रेनवर आला. त्यामुळे तोल जाऊन मोबाईल क्रेन उलटली. याचवेळी बसवला जात असलेला गर्डरही खाली कोसळला आणि क्रेन त्याखाली अडकली.

# शनिवारी पहाटे आकाशात दुर्मीळ ग्रहांची रांग दिसणार

**आकाश निरीक्षणाची आवड असलेल्या नागरिकांसाठी एक दुर्मीळ आणि आकर्षक खगोलीय घटना अनुभवण्याची संधी मिळणार आहे. शनिवार १८ एप्रिल रोजी पहाटे 'प्लॅनेट परेड' म्हणजेच ग्रहांची रांग पाहायला मिळणार आहे. यावेळी बुध , मंगळ, शनि आणि नेपच्यून हे ग्रह पूर्व दिशेला एकाच रेषेत जवळजवळ दिसणार आहेत.**

■ मुंबई

**अनेक** ग्रह एकाचवेळी आकाशात एकाच दिशेत जवळजवळ दिसण्याला प्लॅनेट परेड म्हणतात.हे ग्रह प्रत्यक्षात एका रेषेत नसले



तरी पृथ्वीवरून पाहताना ते एकाच भागात दिसतात. अशा घटना क्वचितच घडतात आणि खगोलप्रेमींसाठी अत्यंत आकर्षणाचे केंद्र ठरतात. पहाटे ४.४५ ते ५.२० या वेळेत पूर्व ते ईशान्य दिशेच्या दरम्यान क्षितिजाच्या अगदी जवळ हे दृश्य दिसणार आहे. यावेळेत आकाश तुलनेने अंधारात असते आणि ग्रह स्पष्ट दिसण्याची शक्यता जास्त असते. खगोल प्रेमी व नागरिकांनी पूर्व दिशेला मोकळे आकाश असलेले ठिकाण निवडावे. शक्य असल्यास दुर्बीण किंवा बायनॉक्युलर वापरावा. हवामान स्वच्छ असल्यासच दृश्य स्पष्ट दिसेल. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आकाशीय सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रा. प्रवीण गुल्हाने व खगोल विभाग प्रमुख विजय गिरुळकर यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# नेस्को ड्रग पार्टी प्रकरणात मनसे-उबाठा आक्रमक

■ मुंबई

**गोरेगाव** येथील नेस्को सेंटर येथे झालेल्या कथित ड्रग पार्टी प्रकरणानंतर राजकीय वातावरण तापले असून, मनसे आणि उबाठा आक्रमक झाली आहे.

या प्रकरणात लाईव्ह म्युझिक कॉन्सर्टदरम्यान ड्रगचे सेवन केल्यामुळे दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. याच पार्श्वभूमीवर मनसेचे गोरेगाव विभाग अध्यक्ष वीरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली नेस्को सेंटरच्या गेटबाहेर जोरदार आंदोलन करण्यात आले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात मुंबई पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी नेस्को सेंटरमध्ये पार्टीच्या नावाखाली रात्रभर धिंगाणा सुरू असतो. भविष्यात अशी घटना पुन्हा घडल्यास नेस्को बंद पाडू, असा इशारा वीरेंद्र जाधव यांनी दिला. तर उबाठाच्या नगरसेविका किशोरी पेडणकर यांनीही गोरेगावच्या वनराई पोलीस ठाण्याला भेट देत पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी उबाठा कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

